
cmyk
बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–७ | गुरूवार दि.२६ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक



**श्री राम नवमी**
निमित्त सर्वांना
हार्दिक शुभेच्छा..!
–संपादक

## खताचे लिंकिंग सुरुच; शेतकरी अडचणीत !

### ५३४ केंद्रांचे परवाने निलंबित, कृषिमंत्री दत्ता भरणे यांची माहिती

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात विशेषतः लातूर, पुणे, नागपूर, नाशिक, सांगली, गडचिरोली, वर्धा जिल्ह्यात शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात युरिया खत खरेदी करताना दुकानदारांकडून इतर खते सुफला, फवारणी औषधे, जैविक औषधे, कीटकनाशके घेणे बंधनकारक केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. यावर कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी मोठा खुलासा केला आहे. त्यांनी राज्यात खताचे लिंकिंग होत असल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या असल्याचे म्हटले आहे.**

याअनुषंगाने गुणनियंत्रण निरीक्षक आणि जिल्हास्तरीय भरारी पथकांमार्फत तपासणी करण्यात आली आहे. सदर तपासणीमध्ये अनियमितता



आढळल्यास संबंधित विक्रेत्यांवर खत (नियंत्रण) आदेश, १९८५ व अत्यावश्यक वस्तू कायदा, १९५५ नुसार कारवाई करण्यात येत आहे. केंद्र आणि राज्य शासनाकडून खतांसाठी लिंकिंग प्रणाली सुरु करण्यात आलेली नाही. तसेच खतांच्या लिंकिंगबाबत व अनियमिततेबाबत तक्रार प्राप्त झाल्यास त्याबाबत तपासणी करुन खत नियंत्रण आदेश, १९८५ चे उल्लंघन केल्याबाबत कारवाई केली जाते, असे कृषिमंत्र्यांनी बुधवारी (दि. २५ मार्च) विधानसभेत लेखी उत्तरात स्पष्ट केले आहे. राज्यात लिंकिंग प्रणालीद्वारे युरिया खताची खरेदी करताना इतर महागडी खते घेण्याची सक्ती करण्यात येत असल्याबाबत आमदार अमित देशमुख, डॉ. आशिषराव देशमुख (सावनेर), शिवाजी पाटील (चंदगड), शंकर जगताप (चिंचवड), सत्यजित देशमुख (शिराळा), बबनराव यादव, रामदास मसराम (आरमोरी), विजय वडेट्टीवार आणि इतरांनी प्रश्न उपस्थित केले होते. त्यावर कृषिमंत्री भरणे यांनी दिलेल्या उत्तरात म्हटले आहे की, लिंकिंग संदर्भात दोषी विक्रेत्यांवर केलेल्या कारवाईबाबत संबंधित जिल्ह्यातील परवाना अधिकारी यांच्या कामकाजाची चौकशी करण्याचे आयुक्त (कृषी) यांना कळविण्यात येत आहे. राज्यात खत विक्रेते आणि उत्पादक यांच्याकडील खतांची गुण नियंत्रण निरीक्षकांकडून ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### साताऱ्याचे एसपी दोशींचं निलंबन मागे

मुंबई : अधिवेशन काळात विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहात शिवसेना नेते देसाई यांनी साताऱ्याचे एसपी तुषार दोशींवर कारवाईची मागणी केली होती. त्यानंतर, उपसभापति नीलम गोऱ्हे यांनी तुषार दोशींच्या निलंबनाचे निर्देश दिले. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी उपसभापतींच्या या निर्देशावर कायदेशीर बाजू समाजावत हे निर्देश देण्याच्या अधिकारावर भाष्य केलं होतं. एकीकडे तुषार दोशींच्या निलंबनावर शिवसेना नेते तथा मंत्री ठाम असताना दुसरीकडे उपसभापति नीलम गोऱ्हेंचे आदेश सभापती राम शिंदेंनी रद्द केले आहेत.

### सुनील तटकरेंचा रोहित पवारांना इशारा

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आमदार रोहित पवार यांच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले. रोहित पवार यांनी सुनील तटतरे आणि खासदार प्रफुल्ल पटेल यांच्यावर गंभीर आरोप केले. अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर काय–काय घडामोडी घडल्या याबाबत आपल्याकडे संपूर्ण माहिती आहे. अजित पवारांच्या अपघातानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार यांच्या विरोधात काय–काय कट कारस्थान रचले गेले याची संपूर्ण माहिती आपल्याकडे आहे, असं सुनील तटकरे यांनी म्हटलं.

### मुख्यमंत्री होण्यासाठी भाजपकडून अघोरी पूजा

मुंबई: नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याच्या प्रकरणात राजकीय आरोप–प्रत्यारोपांच्या फैरी झडत असून आज काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी खळबळजनक आरोप केले आहेत. ''भाजप नेते आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मुख्यमंत्री होण्यासाठी अशोक खरातकडून अघोरी पूजा केल्याची माहिती मिळत आहे, असा दावा सपकाळ यांनी केला आहे.हर्षवर्धन सपकाळ यांनी आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवरून अशोक खरात प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपवर गंभीर आरोप केले आहेत.

## पटेल-तटकरेंनी पक्षाचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला-रोहित पवार

मुंबई । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांनी भारतीय निवडणूक आयोगाला पत्र लिहिले. या पत्रात त्यांनी पक्षाच्या घटनेत बदल झाल्याचा खोटा दावा केला होता. पक्षाचे कार्याध्यक्ष असलेल्या प्रफुल्ल पटेल यांच्या हाती अमर्याद अधिकार सोपवण्याच्या एका पूर्वनियोजित कटानुसार त्यांनी हे पाऊल उचलले होते, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाचे आ. रोहित पवार यांनी केला आहे.

पवार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, अजित पवारांच्या निधनानंतर अवघ्या १८ दिवसांतच १६ फेब्रुवारी रोजी प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहिले. या पत्रात त्यांनी पक्षाच्या घटनेत सुधारणा करण्यात आल्याचा खोटा दावा केला आणि सर्व अधिकार ▶▶ पान २ वर

## दादांचा घातपात असेल तर कोणाचाही बाप असू दे, मुर्दा खोदून काढू-मुख्यमंत्री

मुंबई । प्रतिनिधी

**विधिमंडळ अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी आमदार रोहित पवार यांनी सभागृहात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाच्या चौकशीबद्दल प्रश्न उपस्थित केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात भूमिका मांडली असून रोहित पवारांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. तसेच, अजित दादांचा घातपात असेल तर कोणाचाही बाप असू दे, मुर्दा खोदून काढू असेही ठणकावून सांगितले.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी अंतिम आठवडा प्रस्तावार उत्तर देताना अगोदर अशोक खरात प्रकरणावर भाष्य केलं. याप्रकरणी, कडक कारवाई केली जाईल असे



मुख्यमंत्र्यांनी ठणकावून सांगितले. त्यानंतर, आमदार रोहित पवार यांनी उपस्थित केलेल्या अजित पवारांच्या विमान दुर्घटनेवरही फडणवीसांनी सविस्तर उत्तर दिले. डीजीसीए अहवाल आणि आजपर्यंतच्या तपासाची माहिती दिले. तसेच, अजित दादांचा अपघात हा जर घातपात ▶▶ पान २ वर

## अशोक खरातकडे जाऊन ३८ आमदारांनी बोट कापलं–आव्हाड

मुंबई । प्रतिनिधी

देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्रिपदावरुन दूर करण्यासाठी राज्यातील काही आमदारांनी अघोरी पूजेचा घाट घातला होता. अशोक खरात यानेही या संबंधित नेत्यांना फडणवीसांना मुख्यमंत्रीपदावरुन दूर करु, असे आश्वासन दिल्याचा सनसनाटी दावा आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला. ते बुधवारी विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरील



चर्चेवेळी बोलत होते. अशोक खरातकडे जाऊन ३८ आमदारांनी बोट कापलं असे स्फोटक दावे केले.

अशोक खरात याला वाचवण्यासाठी २००७ साली पहिला बळी पत्रकार बाळू तुपे याचा देण्यात आला. त्यावेळी या प्रकरणाची नाशिकमध्ये प्रचंड चर्चा होती. वृत्तपत्रातही याबाबत लेख छापून आले होते. त्यामुळे अशोक खरात कोण हे पोलिसांना माहिती नव्हते, अशातला भाग नव्हता. या सगळ्या आरोपींना वाचवण्यासाठी पोलिसांनी किती पैसे घेतले ते फक्त देवेंद्र फडणवीस साहेबांना माहिती आहे. अनेक बडे अधिकारी खरातच्या समोर लोटांगण घ्यायचे, त्यांनी खरातला वाचवण्यासाठी बरेच पैसे घेतले, असा दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला. जितेंद्र आव्हाड यांनी देवेंद्र फडणवीस ▶▶ पान २ वर

## पीएनजी असलेल्या भागात एलपीजी पुरवठा होणार बंद

### केंद्राचा मोठा निर्णय, गॅस वाहिनी जोडणीसाठी ४८ तासांची डेडलाईन

नवी दिल्ली । वृतसंस्था

देशातील ऊर्जा साखळीत मोठी सुधारणा करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. ज्या भागात पाइपद्वारे नैसर्गिक वायू उपलब्ध आहे, अशा ठिकाणी घरगुती गॅस ग्राहकांनी पीएनजी जोडणी घेणे आता अनिवार्य करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, पीएनजीची सुविधा उपलब्ध असूनही ज्या कुटुंबांनी ही जोडणी घेतलेली नाही, त्यांचा एलपीजी सिलिंडरचा पुरवठा तीन महिन्यांनंतर कायमचा खंडित केला जाईल, असा स्पष्ट आदेश केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने जारी केला आहे.

जागतिक स्तरावर, विशेषतः पश्चिम आशियातील वाढता भू–राजकीय तणाव आणि विस्कळीत झालेली पुरवठा साखळी विचारात घेता, भारताने आपल्या इंधन धोरणात बदल करण्याचे ठरवले आहे. एकाच प्रकारच्या इंधनावर अवलंबून न राहता ▶▶ पान २ वर


## इराण युद्धामुळे युरिया टंचाईची शक्यता

### खरिपाची जिल्ह्यातून ६४ हजार मेट्रिक टन युरियाची मागणी

बीड । प्रतिनिधी

पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे शेतीसाठी अत्यावश्यक असलेल्या युरिया खताच्या टंचाईचे संकट निर्माण होण्याची चिन्हं दिसू लागली आहेत. अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे लिक्विड नॅचरल गॅस पुरवठ्यावर परिणाम झाला असून, त्याचा थेट फटका खत उत्पादन क्षेत्राला बसत आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यात खरीप हंगामापूर्वी टंचाईची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

आगामी खरीप हंगामासाठी बीड जिल्ह्याने सुमारे ६४ हजार मेट्रिक टन युरियाची मागणी केली आहे. मात्र सध्याच्या परिस्थितीत प्रत्यक्षात किती साठा उपलब्ध होईल याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे.युरिया खताच्या निर्मितीसाठी एलएनजी हा प्रमुख कच्चामाल म्हणून वापरला जातो. भारतातील १८ हून अधिक खत उत्पादक



कंपन्या मोठ्या प्रमाणावर अखाती देश आणि रशिया येथून गॅस किंवा तयार युरियाची आयात करतात.मात्र युद्धामुळे समुद्री वाहतूक विस्कळीत झाली आहे. यामुळे एलएनजीचे दर मोठ्या प्रमाणावर वाढले असून, खत प्रकल्पांना गॅस पुरवठा कमी झाला आहे. परिणामी युरिया उत्पादनाची गती मंदावली आहे.युरिया हा खरीप हंगामातील प्रमुख खत असल्याने या टंचाईचा थेट परिणाम शेतकऱ्यांवर होण्याची शक्यता आहे. उत्पादन घटल्यास ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.२४ मार्च २०२६
आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू: २५४.०० क्विंटल | | |
| २,१६० | २,५०० | २,२४० |
| ज्वारी/हायब्रिड: १८८.०० क्विंटल | | |
| १,८०० | ४,५०० | ३,४४७ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | | |
| १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १.०० क्विंटल | | |
| ६,५०० | ७,००० | ६,७५० |
| उडीद : २.५० क्विंटल | | |
| ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी: ४.०० क्विंटल | | |
| २,००० | २,७३१ | २,४१० |
| मुग: २.०० क्विंटल | | |
| ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १०.०० क्विंटल | | |
| ५,३५० | ५,३५० | ५,३५० |
| हरभरा: १९.०० क्विंटल | | |
| ४,९०० | ५,८०१ | ५,१७५ |


## देशातील रक्तपेढ्यांवर आता 'डिजिटल' पाळत

### स्टॉक आणि उपलब्धतेमध्ये फरक आढळल्यास कठोर कारवाई

नवी दिल्ली । वृतसंस्था

**देशभरातील रक्तपेढ्यांवर आता सरकारची डिजिटल नजर राहणार आहे. सेंट्रल ड्रग्स स्टँडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशन (सीडीएससीओ) ने सर्व परवानाधारक रक्त केंद्रांसाठी ई–रक्तकोष पोर्टलवर नोंदणी अनिवार्य केली आहे. याचा उद्देश देशभरात रक्ताच्या उपलब्धतेची एक केंद्रीकृत प्रणाली तयार करणे आणि काळाबाजार रोखणे हा आहे.**

यावेळी सर्वात मोठा बदल हा आहे की ई–रक्तकोषला थेट तपासणी (इन्स्पेक्शन) प्रक्रियेचा भाग बनवण्यात आले आहे. म्हणजेच, तपासणीदरम्यान ड्रग इन्स्पेक्टर



पोर्टलवर नोंदवलेला डेटा आणि प्रत्यक्ष साठा यांची पडताळणी करतील. डेटामध्ये फेरफार आढळल्यास पहिल्यांदाच कठोर कारवाई केली जाईल. राज्यांच्या परवाना प्राधिकरणाला ३० दिवसांत अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. दात्यांची नोंदणी आता आभा आयडी किंवा आधारशी जोडता येणार आहे, ज्यामुळे संपूर्ण पुरवठा साखळी पारदर्शक होईल.रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना शस्त्रक्रियेदरम्यान रक्ताच्या उपलब्धतेची ▶▶ पान २ वर

**“ तेव्हा फक्त सल्ला होता**

२०२२ मध्ये निर्देश सल्ला होते, जे मानणे बंधनकारक नव्हते. दंडाची तरतूद नसल्यामुळे मनमानी वाढली. पोर्टलच्या डेटाला नियमित तपासणीचा (इंस्पेक्शन) भाग बनवले नाही, जबाबदारी निश्चित झाली नाही. राज्यांच्या परवाना प्राधिकरणा निष्क्रिय राहिल्या आणि लहान केंद्रांकडे डिजिटल प्रशिक्षणाचा अभाव होता.

**“ यावेळी नियम बदलला**

पोर्टलशी जोडले जाणे हा पर्याय नाही, आता ते अनिवार्य झाले आहे. पालन न केल्यास परवान्यावर गदा येईल. रक्तसाठ्यावर देशभरात एका क्लिकवर नजर ठेवणे शक्य होईल. वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत रुग्ण भटकणार नाहीत. जो कोणी नियमांचे पालन करणार नाही, त्याच्याविरुद्ध कठोर कारवाईची तरतूदही करण्यात आली आहे.

## बीडचे डाक कार्यालय बॉम्बने उडवण्याची धमकी




बीड । पतिनिधी

राज्यभरातील डाक कार्यालयांना बॉम्बने उडवून देण्याच्या धमकीने आज संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेची झोप उडवली. बीड येथील बशीरगंज–राजुरीवेस येथील मुख्य पोस्ट कार्यालयालाही अशाच प्रकारचा धमकीचा ईमेल प्राप्त झाल्याने शहरात एकच खळबळ उडाली. खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांनी तातडीने पोस्ट ऑफिस रिकामे करून बॉम्ब शोध व नाशक पथकाचे (BDDS) पीएसआय ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# महायुतीतले महाभारत : सत्तेसाठी मित्रांमध्येच कुरघोडी !

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या सत्तेची समीकरणे जितकी गुंतागुंतीची आहेत, तितकीच ती विसंगती, अविश्वास आणि अंतर्गत संघर्षांनी व्यापलेली दिसत आहेत. 'महायुती' या नावाखाली एकत्र सत्तेत असलेले भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) हे पक्ष वरकरणी एकजूट दाखवत असले, तरी स्थानिक पातळीवर मात्र त्यांच्यातील संघर्ष आता उघडपणे समोर येऊ लागला आहे. सातारा जिल्हा परिषदेच्या पदाधिकारी निवडीच्या निमित्ताने उफाळून आलेला वाद हा केवळ स्थानिक सत्तासंघर्ष नसून, सत्ताधारी मित्रपक्षांमधील परस्पर अविश्वास, वर्चस्ववाद आणि राजकीय 'शह-काटशह'च्या खेळाचे ज्वलंत उदाहरण आहे.

साताऱ्यात घडलेले प्रकार हे लोकशाही व्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांनाच प्रश्न विचारणारे ठरतात. निवडणूकपूर्व आघाडी करून बहुमताचा आकडा गाठलेल्या शिवसेना आणि राष्ट्रवादी गटांकडून सत्ता अपेक्षित असताना, भाजपने आपल्या राजकीय कौशल्याचा आणि प्रशासनिक प्रभावाचा वापर करून संपूर्ण समीकरणच उलथवून टाकले, असा आरोप मित्रपक्षांकडून होत आहे. विशेषतः पोलिस यंत्रणेच्या कथित हस्तक्षेपामुळे सत्ता मिळवण्यात आली, हा आरोप अत्यंत गंभीर आहे. कारण, यंत्रणा जर निष्पक्ष राहिली नाही, तर लोकशाहीची मुळं हादरण्याची भीती निर्माण होते. या संपूर्ण प्रकरणात सर्वाधिक चिंताजनक बाब म्हणजे, सत्ताधारी पक्षातीलच नेते सार्वजनिकरित्या एकमेकांविरोधात उभे ठाकले. पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी ''लोकशाहीचा खून झाला'' अशी तीव्र प्रतिक्रिया देणे, हे केवळ भावनिक उद्गार नसून प्रशासनावरील विश्वास डळमळीत झाल्याचे संकेत आहेत. जेव्हा सरकारमधील वरिष्ठ मंत्रीच पोलीस यंत्रणेच्या निष्पक्षतेवर प्रश्न उपस्थित करतात, तेव्हा सामान्य नागरिकांच्या मनात शंका निर्माण होणे स्वाभाविक आहे. या घटनाक्रमामुळे ''राज्यकारभार खरोखरच लोकशाही पद्धतीने चालतो आहे का, की तो केवळ सत्तेच्या अंकुशाखाली आहे?'' हा प्रश्न अधिक तीव्रतेने पुढे येतो. साताऱ्यातील या 'पॉवर गेम'मागील राजकीय गणिते अधिक खोलवर पाहिली, तर हा संघर्ष केवळ स्थानिक पातळीपुरता मर्यादित नसल्याचे स्पष्ट होते. भाजपने आपल्या मित्रपक्षांना स्पष्ट संदेश दिला आहेसत्ता ही केवळ संख्याबळावर नव्हे, तर रणनीती, संघटनशक्ती आणि यंत्रणांवरील पकड यांवरही अवलंबून असते. शिवेंद्रराजे भोसले यांच्यासारख्या स्थानिक प्रभावी नेत्यांच्या रणनीतीला राज्यस्तरीय नेतृत्वाची साथ मिळाल्याने, भाजपने केवळ एक जिल्हा परिषदच जिंकली नाही, तर आगामी राजकीय समीकरणांमध्ये आपली वरचढ भूमिका अधोरेखित केली आहे. या सगळ्या घडामोडींचे पडसाद राज्याच्या विधिमंडळात उमटणे, ही आणखी एक गंभीर बाब आहे. एकाच सत्तेतील मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री परस्परांवर टीका करताना दिसणे, हे महायुतीतील अंतर्गत ताणतणावाचे स्पष्ट लक्षण आहे. विधान परिषदेतील उपसभापतींकडून पोलीस अधिकाऱ्यांच्या निलंबनाचा आदेश देण्यात येतो आणि त्यालाच सत्ताधारी मंत्र्यांकडून विरोध होतो, ही परिस्थिती प्रशासनातील समन्वयाच्या अभावाकडे बोट दाखवते. यामुळे निर्णयप्रक्रियेत गोंधळ निर्माण होऊन प्रशासनाची कार्यक्षमता कमी होण्याचा धोका निर्माण होतो. पोलीस प्रशासनाला या राजकीय संघर्षात ओढले जाणे, ही लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक बाब आहे. कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी पार पाडणाऱ्या यंत्रणेचा वापर जर राजकीय उद्दिष्टांसाठी केला गेला, तर त्याचा थेट परिणाम सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेवर होतो. अधिकाऱ्यांच्या बदल्या, निलंबन किंवा नेमणुका या जर राजकीय दबावातून होत असतील, तर यंत्रणेवरील विश्वास ढासळतो आणि भ्रष्टाचाराला खतपाणी मिळते. भाजपने साताऱ्यातील या विजयातून केवळ स्थानिक सत्ता हस्तगत केली नाही, तर आगामी विधानसभा निवडणुकांसाठी आपली 'अप्पर हँड' स्थिती मजबूत केली आहे. मित्रपक्षांना शह देत, त्यांना आपल्या राजकीय चौकटीत ठेवण्याची ही रणनीती स्पष्ट दिसते. विशेषतः मुख्यमंत्री शिंदे यांच्या प्रभावक्षेत्रातच त्यांना आव्हान देणे, हे भाजपच्या वाढत्या आत्मविश्वासाचे द्योतक आहे. त्याचबरोबर, राष्ट्रवादी काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात अजित पवार गटाला कोंडीत पकडणे, ही भविष्यातील जागावाटपाच्या राजकारणाची नांदी ठरू शकते. मात्र, या सत्तासंघर्षाच्या खेळात सर्वात मोठे नुकसान झाले आहे ते लोकशाही मूल्यांचे. सदस्य फोडणे, कथित अपहरणाच्या तक्रारी, यंत्रणांचा वापरया सर्व घटनांनी राजकारणातील नैतिकतेचा पाया कमकुवत केला आहे. सत्तेसाठी कोणत्याही थराला जाण्याची प्रवृत्ती वाढत असल्याचे हे संकेत आहेत. एकंदरीत, साताऱ्यातील ही ठिणगी भविष्यात मोठा वणवा पेटवू शकते. महायुतीतील ताणतणाव जर अशाच प्रकारे वाढत गेले, तर सत्तेतील ही एकजूट केवळ नावापुरती उरेल. जनतेच्या दृष्टीने मात्र, या सगळ्या राजकीय खेळांमुळे सरकारची प्रतिमा मलिन होत आहे. विकास, प्रशासन आणि जनहिताचे प्रश्न मागे पडून सत्तासंघर्ष केंद्रस्थानी येत आहे, हीच खरी शोकांतिका आहे. साताऱ्यात भाजपचे कमळ फुलले असले, तरी मित्रपक्षांच्या मनात संशय, असंतोष आणि अविश्वासाची काटेरी झुडपे उभी राहिली आहेत. या काट्यांचे रूपांतर राजकीय जखमांमध्ये झाले, तर त्याचे परिणाम आगामी निवडणुकांत दिसून येतील. सत्तेच्या या 'महाभारता'त विजय कोणाचाही झाला, तरी पराभव मात्र लोकशाहीचा झाला आहेआणि तोच सर्वात मोठा चिंतेचा विषय आहे.

# शेतकऱ्यांना १२ आठवड्यात भु-भाडे व्याजासह रक्कम द्यावे; खंडपीठाचे आदेश

जालना । प्रतिनिधी

**अंबड तालुक्यातील मौजे कासारवाडी साठवण तलावासाठी संपादीत केलेल्या शेत जमिनींचे भुभाडे दरसाल दर शेकडा आठ टक्के दराने आणि रक्कम प्राप्त होईपर्यंत सहा टक्के व्याज, १२ आठवड्यात देण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने प्रादेशिक जलसंधारण अधिकारी आणि जालना जिल्हा जलसंधारण अधिकाऱ्यांना दिले आहेत. यासंदर्भात जालना जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता वाघमारे जबाबदार असल्याचे बोलल्या जात आहे. बऱ्याच वर्षापासून जालना जिल्ह्यामध्ये वाघमारे यांच्याकडे जलसंधारण विभागाचा चार्ज आहे अद्यापर्यंत यांनी शेतकऱ्यांना न्याय देण्यासंदर्भात कोणतीही कारवाई केली नाही असे दिसून येत आहे.**

मौजे कासारवाडी साठवण तलावासाठी जलसंधारण विभागाकडून सन २००८ साली शेत जमीन संपादीत करण्यात आली होती .शेतकऱ्यांनी भुभाडे मिळण्यासाठी ॲड .भाग्यश्री कऱ्हाळे यांच्यामार्फत उच्च न्यायालयात रिट याचिका क्रमांक (९८४/ २०१७) दाखल केली होती. उच्च न्यायालयाने याचिकेवर सुनावणी देतांना आठ महिन्यांच्या शेतकऱ्यांना भुभाडे देण्याचे आदेश दिले होते. सदरील आदेशानंतरही शेतकऱ्यांना मुदतीत भुभाडे मिळाले नाही. परिणामी शेतकऱ्यांनी उच्च न्यायालयात परत एकदा धाव घेत रिट याचिका क्रमांक १५५५/२०२० दाखल केली. सदरील याचिकेवर दिनांक १६ मार्च २०२६ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणी दरम्यान शेतकऱ्यांना आठ टक्के दराने भाडे भरपाई देण्यात यावी. तसेच मुदतीत भुभाडे न दिल्याने भुभाडे रकमेवर भरणा होईपर्यंत सहा टक्के व्याज द्यावे असे आदेश उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिले आहेत. शेतकऱ्यांच्या वतीने ॲड .भाग्यश्री कऱ्हाळे यांनी बाजू मांडली.

### नऊ वर्षांपासून शेतकऱ्यांचा लढा..!

भूभाडे मिळावे यासाठी शेतकऱ्यांनी सन २०१७ साली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. तेव्हा न्यायालयाने आठ महिन्यांच्या आत भूभाडे रक्कम अदा करण्याचे आदेश दिले होते. मात्र जलसंधारण विभागाकडे न्यायालयाच्या आदेशाकडे दुर्लक्ष करत शेतकऱ्यांना भुभाडे देण्यापासून वंचित ठेवले. हतबल झालेल्या शेतकऱ्यांनी परत एकदा याचिका दाखल केली .यावेळी उच्च न्यायालयाने भाडे भरपाईची रक्कम तसेच व्याजाची रक्कम १२ आठवड्यांच्या कालावधीत द्यावी. वेळेच्या अटीचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. उच्च न्यायालयाच्या या कडक पवित्र्यामुळे आता तरी रक्कम मिळण्याची अशा शेतकऱ्यांना आहे.

# दिव्यांगासाठी स्वच्छतागृहातील कामे न करता बिल काढण्याचा अजब प्रकार!

## जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचा अजब करणार

बीड । प्रतिनिधी

**जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात काही होऊ शकते, याचा प्रत्यय आला आहे. ऐन मार्च अखेर कोणालाही कांही कळणार नाही, असे गृहीत धरून अभियंत्याला हाताशी धरून जुन्याच कामाचे बिल काढण्याचा खटाटोप सुरू आहे. याप्रकरणी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी काय निर्णय घेतात याकडे लक्ष लागले आहे.**

यासंदर्भात माहिती अशी की, बीड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभाग क्रमांक एक अंतर्गत जिल्हा परिषदेच्या इमारतीमध्ये स्वच्छतागृहात दिव्यांगासाठी कमोड फ्लॅश, रॅम्प आदी सुविधा करण्यासाठी मान्यता घेण्यात आली. सदर ठिकाणी इमारतीचे बांधकाम सुरू असतानाच जुनेच कमोड नवीन बसविल्याचे दाखविण्याचा घाट घालण्यात आला आहे. सदर कमोड चे लोखंडी खिळे गंजलेले आहेत ते पूर्वीच्याच असल्याचे इमारतीचे बांधकाम केलेल्या मुख्य गुत्तेदाराचे यंत्रणेकडून समजले. बीड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या क्रमांक एक कडून सात लाख रुपयांच्या निधीमधून काही कामे मार्च अखेर हाती घेण्यात आली आहेत यातील स्वच्छ दगडातील कामे न करताच बिल उचलण्याचा सपाटा अधिकाऱ्याच्या गुत्तेदार व अधिकाऱ्यांनी केल्याचे दिसून आले आहे. याप्रकरणी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे काय भूमिका घेतात? याकडे लक्ष लागले आहे आहे.

# व्यसनधीनता एक गंभीर मानसिक आजार मानसोपचार तज्ज्ञ डॉ.जगदीश टेकाळे

**दारु पिणे,सिगारेट ओढणे, चरस,गांजा,नशेच्या गोळयांचे सेवन ही मनोविकारांची लक्षणे वेळीच,योग्य उपचाराने ९५% रुग्ण होतात बरे, अन्यथा भयंकर दुष्परिणाम**

बीड : वाढती व्यसनाधीनता हे वाढत्या गुन्हेगारीचे एक प्रमुख कारण बनले आहे. मात्र, दारू पिणे, सिगारेट ओढणे, चरस, गांजा, नशेच्या गोळ्यांचे सेवन हे मनोविकार आहे, हे लोकांना माहीतच नाही. त्यामुळे नशा करणारे व्यक्ती हळूहळू या मादक पदार्थांच्या आहारी जाऊन व्यसनाधीन बनतात. त्यातून अनेक जण हिंसक होऊन जीवघेणा हल्ला, खून हे असे अनेक समाजघातक कृत्ये घडतात. तर वेळीच आणि योग्य उपचाराने ९५ टक्के रुग्ण बरे होऊन मानसिक आणि सामाजिक स्वास्थही सुदृढ होते.

वाईट सवय म्हणून वाऱ्यावर सोडू नका !

व्यसनाधीनता हे मानसिक आजार असल्याने वेळीच, योग्य औषधोपचाराने बराही होऊ शकतो. त्यामुळे त्याला वाईट सवय लागली, तो वाया गेला. असे समजून त्याला वाऱ्यावर न सोडता नशेखोरीच्या या संकटातून सावरण्याची संधी आणि आधार द्या. यासाठी मानसोपचार तज्ज्ञांच्या मार्गदर्शन घ्यावे, असे आवाहन डॉ.टेकाळे यांनी केले.

**दारू पिणे, सिगारेट ओढणे हे मानसिक आजार आहेत ?**

होय, तंबाखूसह बिडी, सिगारेट, बियर, दारू, गांजा, भांग, अफू या नशा आणणाऱ्या पदार्थांचे सेवन हे मानसिक आजाराच आहेत. नशेच्या गोळ्या घेणे हे सुद्धा एक घातक मनोविकार अनेकांना जडला आहे. झिंग येण्यासाठी इतरही अनेक घटक, पदार्थांचा सर्रास वापर होतो. वेळीच, योग्य औषधोपचाराने हे रोखता येते.

**व्यसनांची सवय लागते कशी ?**

सुरुवातीला केवळ मौजमजा, जिज्ञासा किंवा फक्त टेन्शन आले म्हणून अमली पदार्थांची चव चाखणारे नंतर हळूहळू या गर्तेत आपोआपच अडकतात. स्पर्धेचे युग, कामांचा ताण, बिघडलेली जीवनशैली यामुळेही नशेखोरीत गुरफटले जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. यात मग झोपडपट्टीपासून ते उच्चभ्रू लोकही आहेत. अनेक तरुण कधी मित्रांच्या आग्रहापोटी तर, काही वेळा अभ्यास करताना झोप येऊ नये म्हणून विद्यार्थी अमली पदार्थांचे सेवन करतात. हे प्रमाण आता वाढत चालले आहे.

**व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम कोणते ?**

व्यसनाधीनताही गंभीर समस्या असून याचे अनेक दुष्परिणामही आहेत. मादक पदार्थांच्या आहारी गेलेल्या व्यक्तींचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य बिघडते. त्यातून दुखणे, कुटुंब कलह, घटस्फोट त्यापुढे समाज घातक कृत्ये नशेखोरीतून घडतात. याचे अनेक उदाहरणे आहेत. व्यसनाधीन व्यक्तीने जीवघेणा हल्ला, खून केल्याच्या अनेक घटना रोजच्याच झाल्या आहेत.

तरुणवर्ग व्यसनांमध्ये गुरफटतोय ?

भावनिक चलबिचलता आणि जीवनात थ्रिल म्हणून किशोरवयीन मुलांमध्ये नशेखोरीचे प्रमाण वाढत आहे. अगदी शाळकरी मुलेसुद्धा आता सिगारेट, बियर, दारूचे सेवन करू लागले आहे. त्यापुढे गांजा, चरस, अफू, कोकिन, नशेच्या गोळयांची चटक बहुसंख्य युवापिढीला लागली आहे. तरुण मुलीही या विळख्यात अडकत असल्याने याकडे पालकांनी, समाजाने लक्ष देणे गरजेचे झाले आहे.



व्यसनांना नाही कसे म्हणायचे?

सर्वात महत्त्वाचे म्हणजे व्यसनांच्या सवयी लागण्याआधीच नाही म्हणायचे. दुसरे म्हणजे व्यसनांपासून मुक्त झाल्यावर मनाचा ठाम निश्चय करा. मित्रांनी, कुणी आग्रह धरला तर सरळ आणि स्पष्ट शब्दांत नाही म्हणा. कुटुंबीयांसोबत वेळ घालवा. सतत कामांत व्यस्त आणि स्वस्थ रहा.

**नशेखोरीतून गुन्हेगारी फोफावते ?**

नशेच्या आहारी गेलेल्या व्यक्तींचे मानसिक व शारीरिक संतुलन बिघडते. नशा करण्यासाठी अमली पदार्थ मिळाले नाही की मग चिडचिड, हिंसकवृत्ती, नशा भागवण्यासाठी चोरी, गुन्हेगारी प्रवृत्ती फोफावते. हे त्या व्यक्तीसाठी, कुटुंब आणि समाजासाठी अत्यंत घातक आहे.

पालकांनी काय काळजी घ्यावी?

पालकांनी मुलांकडे विशेष लक्ष द्यावे, ते इंटरनेटचा काय वापर करतात, मोबाईलवर काय बघतात, मित्र कोण आहेत. याची माहिती घेत राहावी, मुलांसोबत गप्पा माराव्या, त्यांना बोलते करावे. मैदानी खेळ खेळावे. गायन, वादन आणि वाचनासह आवडते छंद जोपासावे.

औषधोपचाराने व्यसने सोडता येतात ?

होय, व्यसन करणे हे मनोविकार असल्याने त्यानुसार आजार समजूनच शारीरिक व मानसिक औषधोपचार केले जातात.व्यसने सोडू शकतो, याचा विश्वास निर्माण करून आध्यात्मिक शिक्षणाच्या जोडीने प्रेमळ आणि सुरक्षित वातावरण दिले जाते. त्यांच्यातील कलागुण ओळखून त्यानुसार कामांमध्ये व्यस्त ठेवून व्यसनाशिवायही आनंदी जीवन जगता येते. हे मनावर ठामपणे बिंबवले जाते. सातत्याने काही दिवसांत व्यसनाधीन व्यक्ती व्यसनमुक्त होतो.

**मानसिक आजारांविषयी समज-गैरसमज ?**

होय, समाज प्रगत झाला तरी आजही मानसिक आजारांविषयी अनेक समज-गैरसमज आहेत. महत्वाचे म्हणजे व्यवसनाधीनता हे मानसिक आजार असल्याचे लोकांना माहीतच नाही. औषधोपचाराने दारु, सिगारेट,चरस , गांजा, नशेच्या गोळ्यांचे इतकेच नव्हे तर ऑनलाईन गेमिंग आणि सतत मोबाईलमध्ये गुंग असणारेही या जोखडातून सुटले नाही.

**व्यसनांना पहिल्यांदाच नाही म्हणा**

आज घडीला हजारो-लाखो तरुण नशेखोरीत गुरफटल्याने गुन्हेगारीच्या अनेक घटना घडत आहेत. याचे दुष्परिणाम भयंकर आहेत. व्यसनांमुळे शारीरिक,मानसिक,,आर्थिक आणि कौटुंबिक हानी होते. योग्य मार्गदर्शन आणि उपचाराने या विळख्यातून बाहेर पडता येते. परंतु पहिल्यांदाच व्यसनांना नाही म्हणणे हे त्याहून चांगले असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# चुकीची यादी: समायोजन पुढे ढकलले

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषद शाळांच्या उर्दू माध्यमाच्या शिक्षक व मराठी माध्यमांच्या मुख्याध्यापकांची चुकीची सेवा ज्येष्ठता यादी व माहिती दिल्याचा प्रकार समोर आल्यानंतर दुरुस्तीचे आदेश देत बुधवारी होणारे समायोजन रद्द करुन पुढे ढकलण्यात आले. आता एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात हे समायोजन होणार आहे. मराठी माध्यमाच्या अतिरिक्त २९ मुख्याध्यापक तसेच उर्दू माध्यमाच्या १५ प्राथमिक पदवीधर शिक्षकांचे समायोजन करण्यासाठी बुधवारी समायोजन प्रक्रिया ठेवण्यात आली होती. मात्र बीड तालुक्यातील सदोष शिवा जेष्ठता आल्याने नामुष्कीची वेळ आली. या प्रक्रियासाठी जिल्हाभरातून शिक्षक, मुख्याध्यापक आले होते. दिवसभर मुख्याध्यापक पदवीधरांना महा त्रास सहन करावा लागला. सुनावणीदरम्यान सेवा ज्येष्ठता यादीवर काही शिक्षकांनी आक्षेप घेतला. बीड व अन्य काही तालुक्याची सेवा ज्येष्ठता यादी व इतर माहिती चुकीची असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. याबाबत खात्री झाल्यानंतर समायोजन प्रक्रिया रद्द करण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी समायोजनेसाठी शिक्षक, मुख्याध्यापकांची सेवा ज्येष्ठता यादी व इतर माहिती अद्ययावत करुन सादर करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात उर्दू शिक्षक, मराठी मुख्याध्यापकांचे समायोजन करण्याचे संकेत दिले.शिक्षकाचे समायोजन होऊ शकते.

## पान १ वरून...

### खतांचे लिंकिंग सुरूच;

नियमितपणे तपासणी करण्यात येते. तसेच प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर कारवाई करण्यासाठी राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तरीय ४४ भरारी पथके नेमण्यात आली आहे. राज्यात लिंकिंग न करण्याबाबत वेळोवेळी सूचना देण्यात येतात. राज्यामध्ये ५०,४०४ खत विक्रेत्यांची आणि ७३५ खत उत्पादकांची तपासणी करण्यात आली. राज्यात खताचे एकूण १९,४५९ नमुने तपासले असून १,९७४ नमुने अप्रमाणित आहेत. खताचा एकूण २,४७०.६७ टन साठा जप्त करण्यात आला असून त्याचे मुल्य ४४९.९२ लाख इतके आहे. राज्यात खताचे ९६७ परवाने निलंबित आणि ५१० परवाने रद्द केले आहेत. तसेच ६७ पोलीस केसेस दाखल केल्या आहेत, अस कृषिमंत्री भरणे यांनी सांगितले. युरिया खत विक्रीमध्ये होणारे गैरव्यवहार थांबविण्यासाठी क्षेत्रीयस्तरावर माहिती स्वरुपात ई- पॉस ( -) प्रणालीवर तपासणी करुन ५३४ कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तर ६१ कृषी सेवा केंद्राचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये खत (नियंत्रण) आदेश, १९८५ मधील तरतुदींचे उल्लंघन केल्यामुळे तसेच खताचा पुरवठा करताना अनियमितता केल्या कारणामुळे बल्लारशहा (जि. चंद्रपूर) येथे गुन्हा दाखल केला आहे, असे त्यांनी लेखी उत्तरात नमूद केले आहे.

-----------

### दादांचा घातपात असेल

असेल तर कोणाचाही बाप असू दे, खोदून काढू, सोडणार नाही. कदाचित तुमच्यापेक्षा माझी तीव्रता कमी असू शकते, पण इतकी बोथट नाही की अजित दादांच्या केसमध्ये कोणी कॉन्स्पिरन्सी करेल, तर आम्ही द्याला सोडून देऊ, त्याचा मुडदाही खोदून काढू अशा शब्दात देवेंद्र फडणवीसांनी रोहित पवारांच्या प्रश्नांवर उत्तर देत याप्रकरणी टोकाच तपास करण्याचे ठणकावले. पवार राहूल गांधी यांना भेटले, त्यांनी कर्नाटकमध्ये अपघातासंदर्भाने एफआयर करायला सांगितला. मात्र तसा झिरो एफआयर करता येत नाही, तो चुकीचा आहे. कर्नाटकने राजकीयदृष्ट्या तपास नीट सुरु नाही, यासाठी हा एफआयर दाखल केला आहे. महाराष्ट्राची मानहानी करण्यासाठी हा एफआयआर केला असेल, तुमच्या मनात शंका ठेवू नका. पण, जर यात कोणी असेल तर आकाश पातळ एक करु, मुडदाही खोदून काढू, अशा शब्दात फडणवीसांनी भूमिका मांडली. तुम्ही तरुण आहात, तुमच्या भावना समजू शकतो मात्र अजित दादांच्या अपघाती निधनाबद्दल इतरांच्या भावनाही तेवढ्याच आहेत, असेही फडणवीसांनी सांगितले.

---------------

### पटेल-तटकरेंनी पक्षाचा ताबा

कार्याध्यक्षांकडे सोपवण्यात यावेत, अशी मागणी केली. या संदर्भात ना सुनेत्रा पवार यांना, ना पार्थ पवार यांना विश्वासात घेण्यात आले होते. त्यानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी भारतीय निवडणूक आयोगाला पत्र लिहून विनंती केली की, अजित पवार यांच्या निधनानंतरच्या संक्रमण काळात (म्हणजेच सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारण्याच्या कालावधीत) अशा कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाऊ नये. सुनेत्रा पवार यांची २६ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादीच्या नवीन राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली. रोहीत पवारांनी १० मार्च आणि २६ फेब्रुवारी या तारखांची काही कागदपत्रे सादर केली. ही कागदपत्रे पटेल आणि तटकरे यांच्या स्वाक्षऱ्यांसह निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आल्याचे मानले जाते. या कागदपत्रांमध्ये नमूद करण्यात आले होते की, राष्ट्रीय अध्यक्ष अनुपस्थित असताना सर्व अधिकार राष्ट्रीय कार्याध्यक्षांकडे असतील आणि सर्व निर्णय त्यांच्याद्वारेच घेतले जातील. त्या पत्राने सर्व अधिकार प्रभावीपणे कार्याध्यक्षामध्ये एकवटले होते, असा दावा त्यांनी केला. तसेच, केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांची विधाने संशयास्पद असल्याचे रोहित पवार यांनी आरोप केला की, राष्ट्रवादी काँग्रेसचे नियंत्रण आपल्या हाती घेण्यासाठी काही नेत्यांमध्ये एक पूर्वनियोजित कट शिजला होता. गोयल यांनी सुरुवातीला प्रफुल्ल पटेल हे पक्षाचे अध्यक्ष झाल्याचे प्रतिपादन केले होते, मात्र नंतर आपली ती माहिती चुकीच्या माहितीवर आधारित असल्याचे स्पष्ट केले होते.

---------------

### इराण युद्धामुळे युरिया

बाजारात खताचा तुटवडा निर्माण होऊन दरवाढ होण्याचीही शक्यता वर्तवली जात आहे.या पार्श्वभूमीवर ऑल इंडिया ॲग्रो इनपुट डीलर असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष मोहन कलंत्री यांनी चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी सांगितले की, एलएनजी तुटवड्यामुळे खत उत्पादनावर परिणाम होत असून, सरकारने तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे.पश्चिम आशियातील युद्धाचा परिणाम आता थेट भारतीय शेतीवर होत असल्याचे चित्र स्पष्ट होत असून, खरीप हंगामापूर्वीच खत टंचाईची भीती निर्माण झाली आहे.

-------------

### पीएनजी असलेल्या भागात

'इंधन विविधीकरण' करणे हा यामागचा मुख्य हेतू आहे. पाइपलाइनद्वारे गॅस पोहोचवल्यामुळे एलपीजी सिलिंडरची वाहतूक आणि वितरणावरील ताण कमी होईल. तसेच, शहरांमधून वाचलेला एलपीजी साठा अशा दुर्गम भागात वळवता येईल जिथे अद्याप पाइपलाइन पोहोचलेली नाही. या नवीन नियमावलीत सरकारने काही अपवादही ठेवले आहेत. ज्या भागात किंवा इमारतींमध्ये पाइपलाइनद्वारे गॅस पोहोचवणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य आहे, अशा ग्राहकांना एलपीजी पुरवठा पूर्वीप्रमाणेच सुरू राहील. मात्र, ही तांत्रिक अडचण सिद्ध करण्यासाठी संबंधित गॅस वितरण कंपनीकडून 'ना-हरकत प्रमाणपत्र' मिळवणे बंधनकारक असेल. हे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच त्या ग्राहकांचा एलपीजी कोटा कायम ठेवला जाईल. जीवनावश्यक वस्तू कायदा' आणि 'नैसर्गिक वायू वितरण आदेश, २०२६' अंतर्गत सरकारने पाइपलाइन टाकण्याचे काम गतीने पूर्ण करण्यासाठी कडक मार्गदर्शक तत्त्वे आखली आहेत. गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये पाइपलाइनसाठी ३ कार्यालयीन दिवसांच्या आत प्रवेश मिळवणे आता सोपे होणार असून, अर्ज केल्यानंतर अवघ्या ४८ तासांच्या आत 'लास्ट माईल' पीएनजी जोडणी पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अधिकृत कंपन्यांनी मंजुरी मिळाल्यापासून ४ महिन्यांच्या आत प्रत्यक्ष काम सुरू करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यांचे परवाने रद्द होऊ शकतात.

---------------

### अशोक खरातकडे जाऊन ३८

यांना मुख्यमंत्रीपदावरुन दूर करण्यासाठी काळी जादू आणि अघोरी विद्येच्या माध्यमातून प्रयत्न सुरु असल्याचा आरोपही केला. ते म्हणाले की, मी खात्रीने सांगतो, अशोक खरातच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीला सुरुंग लावण्यासाठी काहीजण प्रयत्न करत होते. हे सर्वजण अशोक खरातकडे पूजा घालायला गेले होते. वेळ आल्यावर मी त्यांचे नाव उघड करेन. ही सगळी माहिती सहा महिन्यांपूर्वी मुख्यमंत्र्यांना मिळाली होती. या नेत्यांच्या खरातसोबत बैठका झाल्या होत्या. तेव्हा अशोक खरात म्हणाला होता, 'मला थोडे दिवस द्या, मुख्यमंत्री घरी गेलेले असतील.' माझ्याकडे ३८ आमदारांची लिस्ट आहे, त्यांनी अशोक खरातकडे जाऊन करंगळ्या कापल्या होत्या. परवा विधानभवनात सगळे आमदार एकमेकांची बोटं तपासून पाहत होते, तू खरातकडे जाऊन आलास का, विचारत होते. ही परिस्थिती महाराष्ट्रात आहे. अशोक खरातच्या ट्रस्टच्या सदस्य असणाऱ्यांना अजून अटक का झाली नाही, असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केला.

---------------

### बीडचे डाक कार्यालय

आहेर व त्यांच्या सहकार्यांनी तपासणी मोहीम हाती घेतली आहे. अत्याधुनिक यंत्राद्वारे पोस्टातील प्रत्येक पार्सल तपासण्यात आले. कोपरा न् कोपरा तपासल्यानंतर काहीच आढळून आले नाही. त्यामुळे पोलिस प्रशासनासह पोस्ट ऑफिसमधील यंत्रणेने सुटकेचा निश्वास सोडला. डाक विभागाच्या विभागीय कार्यालयाला एका निनावी ईमेलद्वारे महाराष्ट्रभरातील कार्यालयांमध्ये स्फोट घडवून आणण्याची धमकी देण्यात आली होती. हा ईमेल बीड कार्यालयाला प्राप्त होताच, याची माहिती तातडीने पोलीस प्रशासनासह जिल्ह्यातील सर्व पोस्ट ऑफिससला देण्यात आली. धमकीचे गांभीर्य ओळखून ीड शहरातील बॉम्ब शोधक व नाशक पथकाने ताफ्यासह घटनास्थळी दाखल होत पुढील पावले उचलण्यात आली. कार्यालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना तातडीने सुरक्षितस्थळी हलवण्यात आले. पोस्ट ऑफिसचा परिसर सील करून सर्वसामान्यांना प्रवेश नाकारण्यात आला. ॉम्ब शोध पथकातील जवानांनी अत्याधुनिक उपकरणांच्या सहाय्याने पोस्ट ऑफीसमधील कानाकोपरा शोधला.दुपारपर्यंत चाललेल्या या शोधमोहिमेत अद्याप कोणतीही संशयास्पद किंवा आक्षेपार्ह वस्तू आढळून आलेली नाही. पोलीस प्रशासनाने नागरिकांना शांततेचे आवाहन केले असून, अफवांवर विश्वास न ठेवण्याचे विनंती केली आहे. दरम्यान, या घटनेमुळे शहरात विविध चर्चांना उधाण आले असून पोलीस या ईमेलचा उगम शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. दरम्यान हा ई-मेल कोईबतुर येथून आल्याचे सुत्रांकडून समजते. ई-मेल करणाऱ्या व्यक्तीने त्यावर 'मला जिवित हानी करायची नाही, फक्त सार्वजनिक प्रॉपर्टीचे नुकसान करायचे आहे, १२.१० मिनिटांनी बॉम्बस्फोट करणार आहे' असाही उल्लेख त्यामध्ये होता असे सांगण्यात येते. पोलिस पुढील तपास करत आहेत.

-------------

### देशातील रक्तपेढ्यांवर आता

अनेकदा चिंता वाटते. कधीकधी, आवश्यक रक्तगट रुग्णालयातच उपलब्ध नसतो, त्यामुळे रुग्णांच्या कुटुंबीयांना तो शोधावा लागतो. औषध नियंत्रण संघटना आणि वैद्यकीय व आरोग्य विभागाद्वारे चालवले जाणारे ई-रक्तकोश पोर्टल आता या समस्येवर एक उपाय बनले आहे.औषध नियंत्रक अजय फाटक म्हणाले की, सर्व नोंदणीकृत रक्तपेढ्यांची यादी या केंद्र सरकारच्या पोर्टलवर उपलब्ध आहे. या रक्तपेढ्या रक्ताच्या साठ्याची स्थिती सतत अद्ययावत करत असतात. त्यामुळे, जेव्हा रक्ताची गरज भासते, तेव्हा नातेवाईक थेट त्या रक्तपेढीशी संपर्क साधू शकतात जिथे ते उपलब्ध आहे. यामुळे एका रक्तपेढीतून दुस-या रक्तपेढीत रक्त नेण्याची गरज भासणार नाही.

--------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. २६ मार्च २०२६



## थोडक्यात

### दोन दिवशीय ग्रंथोत्सवाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, बीड जिल्हा ग्रंथालय संघ व र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई येथे दिनांक २७ व २८ मार्च २०२६ रोजी ग्रंथोत्सव २०२५ चे आयोजन र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई ता.गेवराई जि.बीड येथे आयोजित केले आहे. या दोन दिवसीय कार्यक्रमात भव्य ग्रंथ प्रदर्शन, विक्री व साहित्यीक मेळावा आयोजित केला आहे. या कार्यक्रमात उध्दघाटन सोहळा, आणि साहित्यः चे लेखन, भाषांतर आणि वाचन संस्कृतीवर होणारा परिनाम या विषयावर व्याख्यान, सार्वजनिक ग्रंथालयांची स्थिती काल, आज आणि उद्या यावर परिसंवाद, कवि संम्मेलन व कथाकथन असे विविध कार्यक्रम दोन दिवस आयोजित केले आहे.या कार्यक्रमात बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व प्रशासकीय सेवेतील अधिकारी यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असणार आहे तसेच जिल्ह्यातील साहित्यीकांचे कथाकथन, कवीतांची मेजवानी राहणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रंथोत्सव समितीने केले आहे.



### युसूफवडगांव येथे श्रीराम नवमी निमित्ताने केले १५१ जणांनी रक्तदान

युसूफवडगांव/प्रतिनिधी:-केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे श्रीराम जन्मोत्सव व स्व.मेजर शिवराज खरबड यांच्या स्मरणार्थ आधार युवा मंचच्या वतीने आयोजित रक्तदान शिबीरामध्ये तरूणांनी उत्स्फूर्त पणे सहभागी होत तालुक्यातुन ग्रामीण स्तरावर नवीन उच्चांक करत १५१ जणांनी रक्तदान केले आहे.

युसूफवडगांवचे ग्रामदैवत असलेले प्रभु श्रीराम यांचा जन्मोत्सव व स्व.मेजर शिवराज खरबड यांच्या स्मृती प्रित्यर्थ गेल्या १४ वर्षापासून आधार युवा मंचच्या वतीने सामाजिक उपक्रम व सामाजिक बांधिलकी म्हणुन भव्य अशा स्वरूपात रक्तदान शिबीर आयोजित करण्यात येते याही वर्षी आधार युवा मंचच्या वतीने दि.२५ मार्च रोजी गावातील हनुमान मंदिरात भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.यावेळी गावातील नव तरूणांनी उत्स्फूर्त पणे यात आपला सहभाग नोंदवुन तब्बल १५१ जणांनी रक्तदान केले.हे रक्तदान शिबीर यशस्वी होण्यासाठी आधार युवा मंचच्या सर्व सदस्यांनी मेहनत घेत रक्तदान शिबीर यशस्वी केले.

### आजपासुन युसूफवडगांव येथे श्रीराम नवमी जन्मोत्सव व भव्य यात्रा महोत्सवास सुरुवात

युसूफवडगांव। प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील गावचे ग्रामदैवत असलेले प्रभू श्रीराम यांच्या श्रीराम नवमी जन्मोत्सावाच्या निमित्ताने गावामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सोबतच ३ दिवसांचा भव्ययात्रा महोत्सव आयोजिन करण्यात आलेला आहे.

युसूफवडगांव येथे अतिशय पुरातन श्रीराम मंदिर असुन अंदाजे येथे ३५० वर्षापासुन श्रीराम नवमी जन्मोत्सव सोहळा व यात्रा महोत्सवाची परंपरा असुन या हि वर्षी श्रीराम नवमी जन्मोत्सव सोहळा व भव्य यात्रा महोत्सव असुन याची सुरुवात दि.२६ मार्च पासुन होणार आहे.या दिवशी दु.१२ वा.रामजन्म सोहळा तद्नंतर मंदिरातुन पालखी सोहळा सुरू होईल. तर दु.२ मानाच्या १२ बैलगाड्या ओढण्याचा कार्यक्रम संपन्न होईल.२७ मार्चला रात्री ठिक १२ वा मंदिरातुन छबिना मिरवणूक सुरूवात होईल छबिना मिरवणुक हनुमान मंदिरासमोर विसावल्यावर या ठिकाणी पहाटे ५ वा.पारंपारिक भारूडाचा कार्यक्रम व शोभेची दारु उडवण्याचा कार्यक्रम होईल दि.२८ मार्चला दु.४ वा आमराई मध्ये भव्य कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे तरी सर्व भाविकभक्तांनी श्रीराम नवमी जन्मोत्सव व भव्य यात्रा महोत्सवामध्ये सहभागी होण्याचे आवाहन सरपंच,उपसरपंच,सर्व ग्रा.प.सदस्य व समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## वडवणी शहरातील मुख्य रस्त्यावरील नाली बांधकाम कोसळले, सिमेंट रस्ताही उखडला

वडवणी । प्रतिनिधी

पाडळसिंग ते लोखंडी सावरगाव या राष्ट्रीय साहामार्गावरील शहरातील सिमेंट रस्ता व नाली बांधकाम पूर्णपणे बोगस झालेले असून शहरातील बस स्थानका समोरील नाली कोसळल्याने संबंधित गुत्तेदाराचा भ्रष्ट गिरीचा बोगसपणा उघडा पडलेला आहे. बांधकाम विभागातील अधिकारी यांच्या संगनमताने सुरू असल्याचे पुन्हा उघड झाले. या अगोदर अनेक वेळा वर्तमानपत्रांनी याविषयी आवाज उठऊनही. प्रशासनाने कसल्याही प्रकारची दखल न घेतल्याने शासनाचा कोट्यावधी रुपयाचा निधी पाण्यात जाणार असल्याचे बोलले जात आहे. संबंधित गुत्तेदार

सविस्तर वृत्त असे की वडवणी



शहरातून जाणारा मुख्य रस्त्यावरील सिमेंट रस्ता व नाली काम गेल्या काही महिन्यातच पूर्ण झाले आहे. सिमेंट रस्त्याला मोठमोठ्या भेगा पडुन रस्ता पुर्ण पणे उखडला आहे. अनेक वेळा चालू बांधकामात नालीकाम कोसले ल्याचे प्रकारही घडले आहेत. शहरातील मुख्य रहदारी असलेल्या बस स्थानक व नगरपंचायत कडे जाणाऱ्या रोड लगतची नाली कोसळल्याने संबंधित गुत्तेदाराचा बोगसपणा उघडा पडला आहे.

या झालेल्या सिमेंट रस्ता व नाली कामाचे वरिष्ठ कर्मचाऱ्यामार्फत कामाची तपासणी करुन चोकशी करून निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित गुत्तेदारावर कार्यवाही करुन त्याचे बिल आधा करू नये कडक शासनाच्या कोट्यावधी रुपया निधी वाचवावा आशी मागणी वडवणी शहरातील व्यापार्या मधुन केली जात आहे.

सबंधीत गुतेदाराचा भ्रष्ट कारभाराचा बोगसपणा उघड बांधकाम विभागाचे अधिकारी मुग गिळून गप

का प्रकाश दादांनी लक्ष देण्याची गरज बांधकाम विभागातील अधिकारी यांच्या संगनमताने सुरू असल्याचे पुन्हा उघड झाले असून आ. प्रकाश दादा सोळंके यांनी या कामाकडे स्वतः लक्ष देऊन यासाठी शासनाचा कोट्यावधी रुपयाचा निधीचे चांगले काम करण्यास भाग पाडावे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब, गेवराई बांधकाम विभागाचा भ्रष्ट नमुना पाहण्यासाठी वडवणीला जरूर पहाणी करावी आशी

## आचरणासारखे जगात दुसरे भांडवल नाही -हभप अच्युत महाराज दस्तापुरकर

माजलगाव । प्रतिनिधी

भारतात आचरणाला महत्त्व आहे .आचरणासारखे जगात दुसरे भांडवल नाही असे प्रतिपादन श्री ह.भ. प. किर्तन केसरी अच्युत महाराज दस्तापुरकर यांनी केले. नाखलगाव येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहातील सहाव्या दिवशी ह. भ. प. कीर्तन केसरी अच्युत महाराज दस्तापुरकर किर्तन सेवेमध्ये दि २४ मार्च मंगळवार रोजी बोलत होते.



देह जावो अथवा राहो, पांडुरंगी दृढ भाव, चरण न सोडी सर्वथा, आण तुझी पंढरीनाथा या संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या अभंगावर श्री ह.भ. प अच्युत महाराज दस्तापुरकर यांनी प्रतिपादन केले. त्यावेळी बोलताना महाराज म्हणाले की, पैशाचे झालेली नुकसान भरून निघेल. शरीराला झालेला आजार दुरुस्त होईल, परंतु तोंडाला लागलेलं काळ पुसता येणार नाही. यामुळे जीवनात चारित्र्याला महत्त्व आहे. त्याचे जतन तरुणांनी करावे. काही झाले तरी आपण आचरण जपले पाहिजे. पुढच्या पिढीने नामदेवरायांचा हा सल्ला जोपासला पाहिजे. कोणत्याही क्षेत्रात चांगलं वागण्याला महत्त्व आहे. भारतासारखी संस्कृती जगात नाही. जगाला भारताचे तत्त्वज्ञान घ्यावे लागणार आहे. भारत देश हा शांती प्रधान देश आहे. एक दिवस भारत या विश्वाचे नेतृत्व करेल. ही ताकद आपल्या संस्कृतीत आहे . यावेळी पंढरीनाथ महाराज कदम, जीवन महाराज पाटील यांनी किर्तनाला गायनाची साथ दिली.मृदंगाचार्य परमेश्वर महाराज श्रीरामपूरकर, माणिक महाराज गरड,गोरख महाराज सवासे, बळीराम महाराज शिनगारे, वैभव महाराज ताटे, कृष्णा महाराज शिनगारे यांनी मृदंगाची साथ दिली. यावेळी गावकऱ्यांसह परिसरातील दिंद्रुड, बाभळगाव, पिंपळगाव, आलापुर, बेलुरा, गुजरवाडी, वांगी या गावातील भावीक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या अखंड हरिनाम सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी गावातील तरुण, वारकरी मंडळी, गावकरी प्रयत्न करत आहेत.

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचा

आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत.या सप्ताहात राज्यातील विविध भागांतून नामवंत प्रवचनकार आणि कीर्तनकार सहभागी होत आहेत. प्रवचनासाठी महंत संतोष महाराज शास्त्री (तुळजवाडी), महंत सुरेशानंद महाराज (शृंगारवाडी), महंत शंकर महाराज शास्त्री (मातोरी), महंत रामेश्वर महाराज शास्त्री (ब्रम्हनाथ येळंब), महंत रामगिरी महाराज शास्त्री (येळी) तसेच हनुमान चैतन्य शास्त्री (आळंदी) यांचे मार्गदर्शन भाविकांना लाभणार आहे.कीर्तनकारांमध्ये महंत डॉ. न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री (श्री क्षेत्र भगवानगड), हभप केशव आप्पा नामदास (पंढरपूर), हभप उल्हास महाराज शास्त्री (आळंदी देवाची), हभप सत्यवान महाराज लाटे (बीड), हभप रामेश्वर महाराज शास्त्री भोजने (आळंदी देवाची) आणि हभप पांडूरंग महाराज घुले (देहू) यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. तसेच रामजन्माच्या निमित्ताने हनुमान महाराज शास्त्री यांचे विशेष कीर्तन आणि रामायणाचार्य उद्धव महाराज चोले यांचे तुळशी रामायण सादर होणार आहे. सप्ताहाची सांगता ३० मार्च रोजी महंत स्वामी जनार्दन महाराज मच्छिंद्रगड यांच्या अमृततुल्य काल्याच्या कीर्तनाने होणार असून, त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. सप्ताहादरम्यान विविध विणेकरी, मृदंगाचार्य, तबलावादक, हार्मोनियम वादक आणि झंडेकरी यांचा सहभाग असून संपूर्ण सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडत आहे. या अखंड हरिनाम नरळी सप्ताहाचा लाभ भाविकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन मिडसांगवी ग्रामस्थ आणि श्रीक्षेत्र संस्थान मच्छिंद्रनाथ गड, निमगाव मायंबा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### मच्छिंद्रनाथ गडावर

सहा. पोलीस निरीक्षक मंगेश साळवे आणि त्यांच्या पथकाने केलेल्या योग्य नियोजनामुळे १०-१२ लाख भाविक असूनही कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.भाविकांना सुरक्षित वातावरणात दर्शन घेता आले.प्रभावी समन्वय आणि सतर्कतेमुळे संपूर्ण बंदोबस्त शांततेत पार पडला.पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी पत्राद्वारे नमूद केले की, साळवे यांची ही कामगिरी अत्यंत संवेदनशील आणि सामाजिक जाणीव दर्शविणारी आहे. यामुळे समाजामध्ये बीड पोलिसांच्या कामगिरीबाबत जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. साळवे यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल बीड जिल्हा पोलीस दलाच्या वतीने त्यांचे कौतुक होत आहे.

### बीड शहरातील ओढे-नाले

आहेत आता प्रत्यक्ष प्रशासनाने पाहणी केली तर ही परिस्थिती त्यांच्या लक्षात येईल मात्र नगरपालिका यामध्ये मूग गिळून गप्प आहे जिल्हा प्रशासन देखील याची दखल घेत नाही त्यामुळे बीड शहरातील अनेक नदी नाले आणि ओढे व माफी आणि गळंकरत केल्याचे दिसत आहे परिस्थिती भयानक असली तरी प्रशासनाचा वचक कमी झाल्याचा दिसत आहे विशेषतः जिल्हाधिकारी यांनी याबाबत कठोर पावले उचलून कारवाई करणे गरजेचे आहे मात्र जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाहेर आणि अशा सामाजिक कामामध्ये त्यांना प्रत्यक्ष रस अजिबात नसल्याचे बोलले जात आहे मागील एक वर्षांपूर्वी याच अनधिकृत बांधकाम ओढे आणि नाल्यावरील अतिक्रमणे या संदर्भात काही वृत्तपत्रांमध्ये बातम्याही प्रकाशित झाल्या होत्या मात्र प्रशासन निगरगट्टा असल्याचे पुन्हा एकदा दिसून आले नगरपालिका हद्दीमध्येच मोठ्या प्रमाणात अशी अतिक्रमणे होत आहेत किमान नदी आणि नाले तरी सोडली जावेत परंतु भूमाफियाच्या कचाट्यातून ते देखील सुटलेले नाहीत श्रीमिरी घेऊन प्रशासन गप्प बसत असल्याचेही बोलले जात आहे

### पोलीस भरतीची रिक्त पदानुसार

निवड यादी व तात्पुरती प्रतिक्षा यादी प्रसिध्द करताना उमेदवार यांनी आवेदन अर्जामध्ये नमुद केलेली सर्व माहिती, जन्म दिनांक, सामाजिक प्रवर्ग, समांतर आरक्षण, इ. नमुद केलेल्या माहितीच्या आधारे यादी तयार करण्यांत आलेली आहे. उमेदवार यांनी आवेदन अर्जामध्ये नमुद केलेली माहिती खरी नसल्याचे निर्दशनास आल्यास उमेदवार यांची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यांत येईल. उमेदवार यांचा तात्पुरती निवड यादी मध्ये समावेश झाला याचा अर्थ त्यांना नियुक्ती मिळण्याचा कोणताही हक्क प्राप्त होत नाही. तात्पुरती निवड यादी व तात्पुरती प्रतिक्षा यादी बाबत बाबत कोणत्याही उमेदवार यांना कसल्याही प्रकारचे आक्षेप असल्यास त्यांनी दिनांक २६ मार्च रोजी दुपारी ०१ वाजेपर्यत ... या ई-मेल वर लेखी आक्षेप नोंदविण्यात यावेत. यानंतर प्राप्त झालेल्या अक्षेपाचा कोणताही विचार करणेत येणार नाही यांची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

### ॲड.रवींद्र कानडे समाज भूषण

आखून सामाजिक,सांस्कृतिक व धार्मिक कार्यामध्ये नेहमीच अग्रेसर राहून समाज हिताची केलेल्या कार्याची दखल घेऊन लिंगायत महासंघाच्या वतीने त्यांना समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.त्यांच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत असून निश्चितच त्यांनी माजलगावचे नाव लौकिक केले आहे.सदरील कार्यक्रमात लिंगायत महासंघाचे प्रांताध्यक्ष सुदर्शन बिरादार व प्रमुख उपस्थितीमध्ये धाराशिव जिल्ह्यातील महापौर, उपमहापौर, नगराध्यक्ष नगरसेवक,जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य उपस्थिती होते.सदरील कार्यक्रमास महाराष्ट्र राज्यातील हजारोच्या संख्येने समाज बांधव या कार्यक्रमास उपस्थित होते.

### चोऱ्या,घरफोड्या करणारे

उत्तम गायकवाड वय-४२ वर्ष रा. नागोबा गल्ली चांदणे वस्ती पेठ बीड ता.जि.बीड (टोळी सदस्य) यांचे टोळीवर मालाविरुध्दचे गंभीर गुन्हे, चोरी करणे, दिवसा व रात्री घरफोडी करणे, टॉवरच्या बॅट-या चो-या करणे, कॉपर वायर चोरणे असे गुन्हे दाखल असल्याने व त्यांची जनतेमध्ये दहशत निर्माण, सर्वसामान्य लोकांच्या जंगम मालमत्तेस धोका होत असल्याने सदर टोळीच्या, गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यासाठी व सदर टोळीची पांगा पांग करण्यासाठी त्यांचे टोळी विरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे दि.०४.०२.२०२६ रोजी हद्दपार प्रस्ताव पोलीस अधिक्षक कार्यालयास सादर केला होता. सदर प्रस्तावाची उप विभागीय पोलीस अधिकारी बीड यांनी चौकशी पूर्ण केल्या नंतर पोलीस अधीक्षक बीड यांनी त्यांना दि.१३.०३.२०२६ व दि.२४.०३.२०२६ रोजी त्यांचे म्हणने मांडण्यास संधी दिली असता ते गैरहजर राहीले व त्यांचे टोळीवरील गुन्हे, लोकांमधील दहशत, त्यांची गुन्हेगारी पार्श्वभुमी पाहुन, गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी व सदर टोळीची पांगा-पांग करणे साठी सदर टोळीस बीड, लातुर, धाराशिव जिल्हयाचे कार्यक्षेत्रातुन महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे दोन वर्षे कालावधीसाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दि.२५.मार्च रोजी आदेश पारीत करुन हद्दपार केले आहे. सदरची कामगिरी नवनीत काँवत पोलीस अधीक्षक, बीड अपर पोलीस अधिक्षक, बीड सचिन पांडकर, उप विभागीय पोलीस अधिकारी श्रीमती. पुजा पवार पोनि शिवाजी बंटेवाड स्था.गु.शा.बीड यांच्या मार्गदर्शनाखालील पोलीस निरीक्षक मारोती खेडकर, पोह/सुभाष मोटे, पोह/नितीन राठोड सर्व पोस्टे पेठ बीड सपोउपनि-अभिमन्यु औताडे, पोशि बिबिसेन चव्हाण पोशि/आलिम शेख यांनी केली आहे. भविष्यातही बीड जिल्हयात टोळीने गुन्हे करणारे गुन्हेगांरा विरुध्द व गुंडा विरुध्द कठोर भुमीका घेवुन , तसेच हद्दपार अशा कारवाया करण्याचे संकेत पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी दिले आहेत.

## भारतीय बौद्ध महासभेचा भव्य धम्म मेळावा

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा माजलगाव च्या वतीन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प या ठिकाणी शनिवार दि २१ मार्च रोजी भव्य धम्म मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या मेळाव्याच्या निमित्तान दि १३मार्च २०२६ पासुन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे बौद्धाचार्य श्रामणेर शिबीराचे आयोजन फेब्रुवारी पर्यंत मौजे सावरगाव येथे महिला उपसिका तसेच मौजे बाभळगाव व कल्याण नगर येथे महिला उपासिका शिबीराचे आयोजन करण्यात आले होते त्या शिबीराचा समारोप दि २१ मार्च २०२६ रोजी धम्म मेळाव्यात करण्यात आला या शिबीरासाठी पुज्य भन्ते डॉ बी सारीपुत्त हे होते तर केंद्रिय शिक्षक आद.डॉ युराज मोरे हे होते ,महिला उपासिका शिबीरासाठी केंद्रिय शिक्षीका कल्याण नगर आद.कमलताई डोंगरे महिला जिल्हा अध्यक्षा तर बाभळगाव आद.संजिवनी ताई धन्वे जिल्हा संस्कार सचिव या होत्या या मेळाव्या स मार्गदर्शन करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष,ट्रस्टी तथा केंद्रीय कार्यालय प्रमुख आद. एस के भंडारे , राष्ट्रीय सचिव आद. बी एच गायकवाड, राष्ट्रीय सचिव तथा राज्य प्रभारी आद. भिकाजी कांबळे , महाराष्ट्र राज्य अध्यक्ष आद.यु जी बोराडे, राज्य संरक्षण सचिव आद.अमरसिंह ढाका हे होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा ता अध्यक्ष आद. डॉ भागवत साळवे हे होते तर प्रस्तावीक संस्कार उपाध्यक्ष गुलाब धाईजे यांनी तर सुत्र संचलन सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले या मेळाव्या साठी आद.ॲड बी बी धन्वे जिल्हा अध्यक्ष बीड प आद महालिंग निकाळजे , जिल्हा संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे, जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे,आशाताई मोरे,जिल्हा संघटक बी सी डोंगरे, शोभाताई भोजने,शारदाताई तांगडे,माजी जिल्हा अध्यक्ष विष्णु कांबळे,जिल्हा कोषाध्यक्ष सुनिल शिंदे,तालुका अध्यक्षा मंदाताई साळवे,शहर अध्यक्षा मायाताई स्वामी,शहर अध्यक्ष प्रा एल आर मस्के हे उपस्तीत होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डी एस साळवे, दयानंद साळवे,एन डी गायकवाड,मोहन काकडे,बळीराम काकडे, बाबासाहेब घनघाव ,वंदनाताई घनघाव,वंदनाताई साळवे,कोमलताई डोंगरे,अनुराधाताई साळवे,नितिन डोंगरे,भगवान डोंगरे,भानुदास साळवे,राजेभाऊ साळवे,डी पी पोटभरे डी पी वाघमारे,कावेरी साळवे,चंद्रकला साळवे सह भारतीय बौद्ध महासभेच्या पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.



## प्रपंच असो की परमार्थ माणसाची खरी किंमत आचरणातच -श्रीराम महाराज चोले

वडवणी । प्रतिनिधी

धुनकवाड येथे धुनकेश्वराच्या कृपाशीर्वादाने सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या तिसऱ्या दिवसाची किर्तन सेवा ह.भ.प. श्रीराम महाराज चोले (खडकी)यांच्या सुश्राव्य वाणीत संपन्न झाली. त्यांच्या प्रभावी आणि विचारप्रवर्तक किर्तनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.

किर्तनात महाराजांनी प्रपंच आणि परमार्थ यांचा समतोल साधण्याचे महत्त्व पटवून दिले. ''प्रपंच असो की परमार्थ, माणसाची खरी किंमत त्याच्या आचरणात असते'' असे सांगताना त्यांनी जीवनातील कर्म, पाप-पुण्य आणि अहंकार यांवरही भाष्य केले. ज्याला संसार नीट जमला नाही, त्याला परमार्थ कसा साधणार असे ठाम विधान करत त्यांनी जीवनातील जबाबदाऱ्या पार पाडण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

तसेच संतांमुळेच देवाला किंमत आहे, संतांनीच देवाला लोकांपर्यंत आणले असे सांगत संतपरंपरेचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. हिंदू सनातन धर्माची माहिती तरुण पिढीपर्यंत पोहोचली पाहिजे असे आवाहनही त्यांनी केले. किर्तनादरम्यान संत एकनाथ महाराजांचा ''संत आले वरले दिंडी''



हा अभंग सादर करत त्यांनी वारकरी संप्रदायातील भक्तीमय वातावरण उभे केले. टाळ-मृदुंगाच्या गजरात, पंढरीच्या वारीतील दिंडी, पताका आणि विठ्ठलभक्तांची ओढ यांचे सुंदर वर्णन त्यांनी भाविकांसमोर उभे केले. या किर्तन सेवेमुळे धुनकवाड परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नामस्मरणाचा लाभ घेतला.



## आरुष राऊत पाचवी नवोदय परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण घेऊन तालुक्यामध्ये प्रथम

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरातील ज्ञान दाणाचे भंडार असना-या बीड विस्तार अधिकारी मनोज धस यांची प्रश्नाला वसुंधरा प्राथमिक विद्यालय या विद्यालयाची प्रत्येक परीक्षेत मग नवोदय असेल स्कोलरशिप, स्पर्धात्मक परीक्षा सर्वच परीक्षांमध्ये घवघवीत देश संपादन कयणारे विद्यालय म्हणुन आज नाव लौकीक करत आहेत.अशा प्रशालेतील विद्यार्थी आरूष यशवंत राऊत हा विद्यार्थी नवोदय ५ वी वर्गाच्या परीक्षेमध्ये तालुक्यामध्ये प्रथम आला आहे.आल्याबद्दल सुप्रभात ग्रुपच्या वतीने आरुष राऊत याचा सत्कार करण्यात आला यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर नाना आरुष चे आजोबा नामदेव भाऊ राऊत, विठ्ठलराव बनसोडे आण्णा ,यांना पोपटराव घुले सर, ज्येष्ठ पत्रकार उत्तमरावजी बोडखे, बबनराव खंडागळे, झांजे मामा, रासकर सर, पारखे मामा, अँड विधाते, बंडू आबा आजबे, यशवंत राऊत सर दै पुढारीचे पत्रकार शरद रेडेकर आदी

## एलपीजी गॅस व इंधन मुबलक उपलब्ध; अफवांवर विश्वास ठेवू नये-जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

जालना । प्रतिनिधी

**आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यात एलपीजी गॅस व इंधन टंचाई निर्माण झाल्याच्या अफवा पसरत आहेत. या अफवांमुळे पेट्रोल पंपांवर नागरिकांची अनावश्यक गर्दी होत असल्याचे दिसून येत आहे. मात्र, जिल्ह्यात एलपीजी गॅस, पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा पूर्णपणे सुरळीत सुरू असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली आहे.**



जिल्हाधिकारी मित्तल यांनी स्पष्ट केले की, काही पेट्रोल पंप चालकांकडून गॅस व तेल कंपन्यांना देयके उशिरा भरल्यामुळे इंधन पुरवठ्यात तात्पुरता विलंब झाला होता. या घटनेचा चुकीचा अर्थ काढून इंधन टंचाईच्या अफवा पसरल्या. परिणामी, अनेक नागरिकांनी वाहनांमध्ये अतिरिक्त इंधन साठवण्याचा प्रयत्न करत पेट्रोल पंपांवर गर्दी केली. जिल्हा प्रशासनाने सर्व तेल कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या सूचना दिल्या असून, जिल्ह्यात इंधनाचा कोणताही तुटवडा भासणार नाही याची पूर्ण खबरदारी घेतली जात आहे. तसेच, सोशल मीडियावर किंवा इतर माध्यमांतून चुकीची माहिती व अफवा पसरवणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. जिल्ह्यातील सर्व गॅस एजन्सींमध्ये घरगुती एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध असून, पेट्रोल व डिझेलचा पुरवठाही नियमितपणे सुरू आहे. पुरवठा साखळी सुरळीत कार्यरत असल्याने नागरिकांनी घाबरून न जाता शांतता व संयम राखावा आणि साठेबाजी टाळावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

## माहितीच्या अधिकारात माहिती दिली नाही; उपोषण करण्याचा इशारा

बीड । प्रतिनिधी

माहितीच्या अधिकारात विहीत अर्जाद्वारे माहिती मागूनही बीड येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी माहिती दिली नाही. याप्रकरणी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे. सदरील माहिती तात्काळ देण्यात यावी, अन्यथा उपोषण करण्याचा इशारा माणिक चव्हाण यांनी दिला आहे. बीड येथील महसूल विभाग बिल्डिंग बांधकामाची माहिती, माहितीचे अधिकार कायद्यानुसार मागण्यात आली. तथापि सदर माहिती देण्यास उपअभियंता इंजि. आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी टाळाटाळ केली आहे. सदरील कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला आहे. अंदाजपत्रकानुसार काम करण्यात आले नाही. त्यामुळे माहितीचा अधिकारात माहिती मागितली असता संभधीतांनी जाणीवपूर्वक टाळाटाळ केली आहे. याप्रकरणी तात्काळ दखल घ्यावी, अन्यथा उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

# शेतकरी कर्जमाफीचा प्रस्ताव विचाराधीन नाही

## केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची लोकसभेत स्पष्टोक्ती

दिल्ली / वृत्तसंस्था

केंद्र सरकारच्या पातळीवर शेतकऱ्यांसाठी संपूर्ण कर्जमाफीचा कोणताही प्रस्ताव सध्या विचाराधीन नाही, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत स्पष्ट केले. लोकसभेत शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबद्दल प्रश्न उपस्थित करण्यात आला.

लोकसभेत उत्तर देताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या की, ‘‘केंद्र सरकारचा शेतकऱ्यासाठी संपूर्ण कर्जमाफी करण्याचा कोणताही प्रस्ताव नाही. मात्र शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी सरकारकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने किसान क्रेडिट कार्ड योजनेअंतर्गत वेळेवर आणि पुरेसा कर्जपुरवठा केला जात आहे.‘‘ असे त्यांनी सांगितले. किसान क्रेडीट कार्ड योजनेतून पीक कर्जासाठी ३ लाखांपर्यंत कर्ज सवलतीच्या व्याजदराने दिले जाते. तसेच वेळेवर परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना अतिरिक्त प्रोत्साहनही देण्यात येत असल्याची माहिती अर्थमंत्री सीतारामन यांनी सभागृहात दिली. तर सरकारने तारणमुक्त



अल्पकालीन कृषी कर्जाची मर्यादा १.६० लाखांवरून वाढवून २ लाखांपर्यंत केली आहे, असेही सांगितले. तर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या प्राधान्य क्षेत्र कर्ज मार्गदर्शक तत्त्वांनुसार कृषी क्षेत्रात बँकांकडून पुरेशा प्रमाणात कर्जपुरवठा होईल याचीही खात्री केली जात असल्याचा दावाही त्यांनी केला. केंद्र सरकारने पीक विमा योजना आणि थेट आर्थिक मदत देणारी पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना अर्थात पीएम किसान सुरू केली आहे. या योजनेतून जमीनधारक शेतकऱ्यांना थेट आर्थिक सहाय्य दिले जात असल्याचे प्रतिपादन अर्थमंत्र्यांनी केले.

कर्जमाफीची शेतकऱ्यांची मागणी

दरम्यान, देशपातळीवर शेतकऱ्यांची कर्जमाफ करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे. संयुक्त किसान मोर्चाने नुकतीच दिल्ली येथील रामलीला मैदानावर किसान महापंचायत आयोजित केली होती. या महापंचायतीमध्ये हमीभाव कायद्यासह शेतकरी कर्जमाफीची मागणी करण्यात आली आहे. तसेच विविध मागण्यांसाठी शेतकऱ्यांच्या स्वाक्षरीचे पत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवण्यात आले आहे.

## शेतकऱ्याला सन्मान मिळेपर्यंत आमचा लढा - राजू शेट्टी



सोलापूर : अन्नदाता शेतकरी उपहासाचा विषय ठरला आहे. हाच शेतकरी जोवर सन्मानाचा, प्रतिष्ठेचा विषय होत नाही, तोवर आमचा लढा आणि संघर्ष सुरूच राहील, असे प्रतिपादन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केले.

शेती व्यवसायात बुवा-बाबांचा शिरकाव, मंत्रतंत्राचा वापर चीड आणणारा असल्याचेही सांगून मंत्रा-तंत्राने शेती यशस्वी झाली असती, तर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असत्या का, असा सवालही श्री. शेट्टी यांनी उपस्थित केला. सरहद, पुणे आणि कृष्णा पब्लिकेशन यांच्या वतीने आयोजित शहीद भगतसिंग यांच्या पुतणीने लिहिलेल्या ‘युगद्रष्टा भगतसिंग आणि त्यांचे मृत्युंजयी पूर्वज’ या भगतसिंग यांच्या जीवनचरित्राचे प्रकाशन व ‘युगद्रष्टा भगतसिंग राष्ट्रीय पुरस्कार’ प्रदान सोहळ्यात शेट्टी बोलत होते. या वेळी मायदेश फाउंडेशनचे अरुण जोशी, सत्यशील राजगुरू, ज्येष्ठ उद्योगपती कृष्णकुमार गोयल, सरहद संस्थेचे संजय नहार, कृष्णा पब्लिकेशनचे संचालक चेतन कोळी, अनुवादक इंद्रायणी चव्हाण, प्रसिद्ध व्याख्याते केतन पुरी आदी उपस्थित होते. शेट्टी म्हणाले, ‘‘ज्यांच्या नावाचा, कार्याचा आदर्श घेत चळवळीत उतरलो, आज त्याच सरदार भगतसिंग यांच्या नावाचा पुरस्कार मिळणे, हा माझा फार मोठा सन्मान आहे. किरणजितसिंग म्हणाले, की भगतसिंग व्यक्तीपुरते मर्यादित नव्हते. ती विचारधारा आहे. अन्यायाविरोधात संघर्ष, ही त्यांची भूमिका आजच्या पिढीला प्रेरक ठरेल. अरुण जोशी, कृष्णकुमार गोयल, संजय नहार, अनुवादक इंद्रायणी चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. चेतन कोळी यांनी प्रास्ताविक केले. देवदत्त भिंगारकर यांनी सूत्रसंचालन केले.

## उन्हाळी सोयाबीन लागवड आणि नियोजन

उन्हाळी सोयाबीन हे महत्वाचे तेलबिया पिक म्हणून सर्वत्र घेतले जाते. तसेच हे कडधान्य म्हणून आणि प्रक्रिया करून देखील वापरले जाते. कमी खर्चात जास्तीतजास्त उत्पादन देणारे नगदी पीक म्हणून सोयाबीनच्या क्षेत्रात झपाट्याने वाढ झालेली आहे.

जमिनीचा प्रकार : उन्हाळी सोयाबीनची लागवड ४.५ ते ८.५ च्या पीएच (सामु) असलेल्या जमिनीत केली तरी चालते. ज्या जमिनीत जास्त प्रमाणात पाणी साचुन राहत असेल त्या जमिनीत सोयबीन ची लागवड करु नये.

हवामान : सोयाबीन दिवसा कमी तास सुर्यप्रकाश लागणारे पिक आहे. सोयाबीन ला जसा जसा दिवसाचा सुर्यप्रकाशाचा कालावधी कमी कमी होत जाईल तसे तसे फुल धारणा होत असते. उष्ण हवामान या पिकास चांगले मानवते.

पिकाची जात : मराठवाडा कृषी विद्यापीठाने विकसित केलेल्या एमएयूएस ४७ (परभणी सोना), एमएयूएस ६१ (प्रतिकार), एमएयूएस ६१-२ (प्रतिष्ठा), एमएयूएस ७१ (समृद्धी), एमएयूएस ८१ (शक्ती), एमएयूएस १५८, एमएयूएस १६२ इ. सुधारित वाणांची निवड करावी.

लागवड : १ एकरात पेरणीसाठी ३० ते ४० किलो बियाणे पुरेसे होते. पेरणीतील अंतर हे दोन ओळीत ७५ से.मी. आणि दोन रोपांत १० .सें.मी. राहील असे करावे. एका ठिकाणी २ किंवा ३ बिया टोचता येतात. पेरणी करताना जमिनीत फार खोलवर पेरणी करु नये.

पाणी व्यवस्थापन : सोयाबीनमध्ये रोप, फुलोऱ्याची व शेंगा भरण्याची अवस्था या पाण्याच्या ताणास संवेदनशील आहेत. या कालावधीत १५-२० दिवसात पाऊस कमी झाल्यास या अवस्थेत पिकास पाणी दिल्यास उत्पादनात भर पडते.

रोग नियंत्रण : उगवणीच्या काळात बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण होण्यासाठी जैविक बुरशीनाशके किंवा बुरशीनाशकांची बीजप्रक्रिया आवश्यक आहे. क्लोरोपायरीफॉस २० टक्के इसी १.५ लि. प्रति है. किंवा ट्रायझेफॉस ४० टक्के इसी ८ मि.ली. पेरणीनंतर ८ ते १० दिवसांनी आणि पीक फुलोऱ्यात असताना ५-७०० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारावे.



## कीटकनाशके आणि खते मिक्सींग पिकांसाठी घातकच

आजकाल शेतीमध्ये कीटकनाशके, बुरशीनाशके, तणनाशके आणि विविध प्रकारची रासायनिक व विद्राव्य खते मोठ्या प्रमाणात वापरली जात आहेत. वेळ, मजुरी आणि खर्च वाचवण्यासाठी अनेक शेतकरी एकाच फवारणीत दोन किंवा तीन औषधे एकत्र मिसळून वापरतात. मात्र, योग्य तांत्रिक माहितीशिवाय केलेले हे मिक्सिंग पिकांसाठी अत्यंत घातक ठरू शकते, असा इशारा कृषी विभागाने दिला आहे. सर्व रसायने एकमेकांशी सुसंगत नसतात. काही औषधे किंवा खते एकत्र केल्यास त्यांच्यात रासायनिक प्रतिक्रिया होऊ शकते. त्यामुळे मिश्रण गरम होणे, दही पडणे, साका तयार होणे किंवा रंग अचानक बदलणे असे प्रकार घडतात. अशा मिश्रणाची फवारणी केल्यास पिकांची पाने जळणे, वाढ खुंटणे, फुलगळ होणे किंवा उत्पादनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता वाढते. काही वेळा फवारणीचा अपेक्षित परिणाम शून्यही ठरतो.

फवारणी करताना अशी घ्या काळजी : फवारणी करताना औषधे घालण्याची एक ठराविक क्रमपद्धत आहे. प्रथम फवारणीच्या टाकीत पाणी घ्यावे. त्यानंतर विद्राव्य खते टाकावीत, मग भुकटी स्वरूपातील औषधे, त्यानंतर ओलसर भुकटी किंवा प्रताही औषधे आणि शेवटी द्रव स्वरूपातील औषधे घालावीत. बोर्डो मिश्रण हे नेहमी स्वतंत्रपणे फवारावे. त्यात कोणतेही कीटकनाशक किंवा खत मिसळणे



धोकादायक ठरू शकते. औषधांची भेसळ हा अत्यंत संवेदनशील विषय आहे. तांत्रिक माहिती किंवा तज्ज्ञांचा सल्ला न घेता खत व कीटकनाशकांचे मिक्सिंग करू नये. याबाबत शेतकऱ्यांमध्ये योग्य जनजागृती होणे गरजेचे आहे, असे कृषी विभागाचे मत आहे.

‘जार टेस्ट’ का करावी : दोन औषधे किंवा खते एकत्र वापरता येतील की नाही, याबाबत शंका असल्यास ‘जार टेस्ट’ करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी एका छोट्या पारदर्शक बाटलीत किंवा काचेच्या जारमध्ये पाणी घ्यावे आणि फवारणीसाठी वापरण्याच्या प्रमाणात औषधे मिसळून पाहावीत. जर मिश्रण गरम झाले, दही पडले, साका साचला किंवा रंग बदलला, तर ते मिश्रण फवारणीसाठी अजिबात वापरू नये. लेबलवरील सूचना व कृषी तज्ज्ञांचा सल्ला घेऊनच औषधांची भेसळ करावी.

सुसंगत जोड्या : बहुतेक कीटकनाशके आणि बुरशीनाशके एकत्र वापरता येतात. १९:१९:१९ सारखी विद्राव्य खते कीटकनाशकांसोबत दिल्यास पिकांची वाढ आणि किडींपासून संरक्षण एकाच वेळी मिळते. बुरशीनाशकांसोबत अमिनो ॲसिड किंवा ह्युमिक ॲसिड दिल्यास पिकांना रोगातून सावरण्यास मदत होते. तसेच, निम तेल रासायनिक कीटकनाशकांसोबत वापरल्यास किडीवरील नियंत्रण अधिक प्रभावी ठरते.

अशी मिक्सिंग टाळा : गंधक (सल्फर) आणि कोणतेही तेलयुक्त औषध किंवा निम तेल एकत्र वापरू नये. असे केल्यास पिकांची पाने करपण्याचा धोका असतो. ब्ल्यू कॉपर, कोसाईड ही औषधे विद्राव्य खते (एनपीके) किंवा अँटीबायोटिक्ससोबत मिसळू नयेत. कॅल्शियम नायट्रेट आणि सल्फेटयुक्त किंवा फॉस्फरसयुक्त खते एकत्र केल्यास साका तयार होतो आणि ठिबक सिंचन व्यवस्था चोकअप होण्याचा धोका वाढतो.योग्य माहिती, जार टेस्ट आणि तज्ज्ञांचा सल्ला घेतल्यास खत व औषधांचे मिक्सिंग सुरक्षित आणि फायदेशीर ठरू शकते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५५२ : गुरू अमर दास शिखांचे तिसरे गुरू बनले.
१९०२ : नेमस्त पक्षाचे अध्वर्यू नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे मध्यवर्ती कायदेमंडळात अर्थसंकल्पावर पहिले भाषण झाले.
१९१० : लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी औंध संस्थानातील कुंडलच्या माळावर कारखाना उभारण्यास सुरूवात केली.
१९४२ : इंदिरा नेहरू व फिरोझ गांधी यांचा विवाह.
१९४२ : ऑस्विच येथील छळछावणीत ( ) पहिले महिला कैदी दाखल झाले.
१९७२ : नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे पहिल्या जागतिक संस्कृत परिषदेस सुरूवात झाली.
१९७४ : गढवालमधील हेनवलघाटी येथे गौरा देवी यांच्या नेतृत्त्वाखाली चिपको आंदोलनाची सुरूवात.
१९७९ : अन्वर सादात, मेनाकेम बेगिन आणि जिमी कार्टर यांनी वॉशिंग्टन (डी. सी.) येथे इस्त्रायल-इजिप्त शांतता करारावर सह्या केल्या.
२००० : ब्लादिमिर पुतिन यांची रशियाच्या अध्यक्षपदी निवड झाली.
२०१३ : त्रिपूरा उच्च न्यायालयाची स्थापना.
१९७१ : बांगलादेश चा स्वातंत्र्य दिन

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७४ : अमेरिकन कवी रॉबर्ट फ्रॉस्ट यांचा जन्म. (मृत्यू: २९ जानेवारी १९६३)
१८७५ : दक्षिण कोरियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष सिंगमन र्‍हीं यांचा जन्म. (मृत्यू: १९ जुलै १९६५)
१८६९ : जॉर्ज वॉशिंग्टन ब्रिज चे रचनाकार ओथमर अम्मांन यांचा जन्म. (मृत्यू: २२ सप्टेंबर १९६५)
१८८१ : गुच्ची फॅशन कंपनी चे निर्माते गुच्चिओ गुच्ची यांचा जन्म. (मृत्यू: २ जानेवारी १९५३)
१९९८ : पुमा से कंपनी चे निर्माते रुडॉल्फ दास्स्लेर यांचा जन्म. (मृत्यू: २७ ऑक्टोबर १९७४)
१९०७ : हिन्दी कवयित्री, स्वातंत्र्यसैनिक, शिक्षणतज्ज्ञ महादेवी वर्मा यांचा जन्म. (मृत्यू: ११ सप्टेंबर १९८७)
१९०९ : साहित्यिक, संशोधक, दैनिक गोमंतक चे पहिले संपादक बाळकृष्ण दत्तात्रेय तथा बा. द. सातोस्कर यांचा जन्म. (मृत्यू: २७ नोव्हेंबर २०००)
१९७३ : गुगल चे सह-संस्थापक लॅरी पेज यांचा जन्म.
१९८५ : झिम्बाब्वेचा क्रिकेट खेळाडू प्रॉस्पर उत्सेया यांचा जन्म.
१९३३ : भारतीय कवि आणि विद्वान आचार्य कुबेर नाथ राय यांचा जन्म (मूत्यू : ५ जून १९९६)
१९३० : अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला न्यायमूर्ती सँड्रा डे ओ’कॉनर यांचा जन्म
१९१६ : अमेरिकन बायोकेमिस्ट आणि शैक्षणिक - नोबेल पारितोषिक ख्रिश्चन बी. अँफिनसेन यांचा जन्म (मृत्यू : १४ मे १९९५)
१८९३ : इटालियन न्याय मंत्री, इटालियन पत्रकार आणि राजकारणी पाल्मिरो टोग्लियाट्टी यांचा जन्म (मृत्यू : २१ ऑगस्ट १९६४)
१८७९ : जॉर्ज वॉशिंग्टन ब्रिजचे रचनाकार ओथमर अम्मांन यांचा जन्म (मृत्यू : २२ सप्टेंबर १९६५)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२७ : कर्णबधिर संगीतकार लुडविग व्हान बीथोव्हेन यांचे निधन. (जन्म: १६ डिसेंबर १७७०)
१८२५ : वेस्टर्न युनियन चे सहसंस्थापक अंसन स्तागेर यांचे निधन. (जन्म: २० एप्रिल १८२५)
१९३२ : कॅडिलॅक आणि लिंकन कंपनी चे स्थापक हेन्री एम. लेलंड यांचे निधन. (जन्म: १६ फेब्रुवारी १८४३)
१९९६ : चित्रकार के. के. हेब्बर यांचे निधन.
१९९६ : हेल्वेट पॅकार्ड कंपनीचे एक संस्थापक डेव्हिड पॅकार्ड यांचे निधन. (जन्म: ७ सप्टेंबर १९१२)
१९९७ : गांधीवादी, स्वातंत्र्यसैनिक आणि उद्योगपती नवलमल फिरोदिया यांचे निधन. (जन्म: ९ सप्टेंबर १९१०)
१९९९ : प्रयोगशील संगीतकार आनंद शंकर यांचे निधन. (जन्म: ११ डिसेंबर १९४२)
२००३ : गुजरातचे मंत्री हरेन पंड्या यांची हत्या.
२००८ : दलित साहित्यिक बाबुराव बागूल यांचे निधन. (जन्म: १७ जुलै १९३०)
२०१२ : प्रसिद्ध पराङ्मुख गीतकार व कवी माणिकराव गोडघाटे ऊर्फ ग्रेस यांचे निधन. (जन्म: १० मे १९४०)
२०१५ : स्वीडिश कवी, अनुवादक आणि मानसशास्त्रज्ञ - नोबेल पुरस्कार टॉमस ट्रान्सट्रोमर यांचे निधन (जन्म: १५ एप्रिल १९३१)
२००९ : मेक्सिको राज्याच्या पहिल्या महिला गव्हर्नर ग्रिसेल्डा अल्वारेझ यांचे निधन (जन्म: ५ एप्रिल १९१३)
१९४५ : युनायटेड किंगडमचे पंतप्रधान यांचे निधन (जन्म: १७ जानेवारी १८६३)
१८८५ : वेस्टर्न युनियनचे सहसंस्थापक अंसन स्तागेर यांचे निधन (जन्म: २० एप्रिल १८२५)

## सोप्या पद्धतीने आल्यापासून सुंठेची निर्मिती

शेतकऱ्यांनो आले या पिकापासून प्रक्रिया करून खारे आले, आलेपाक, आल्याचे सरबत, वाळलेले आले आणि आल्याचे लोणचे ,सुंठ इत्यादी पदार्थ बनवले जातात. सुंठ तयार करावयास वापरावयाच्या आले पिकाची काढणी परिपक्व झाल्यानंतर करावी. ते पूर्ण वाढलेले, निरोगी असावे. सुंठीसाठी वापरायचे आले अधिक तंतुमय असू नये. रिओडी जानेरो, माहीम यांसारख्या कमी तंतुमय असणाऱ्या जातींचा वापर करावा. यापासून उत्तम प्रतीची सुंठ तयार होऊन चांगला बाजारभाव मिळतो.

मलबार पद्धती : या पद्धतीत आले स्वच्छ निवडून आठ-दहा तास पाण्यात भिजत ठेवतात.

त्यानंतर त्याची साल काढून दोन टक्के चुन्याच्या द्रावणात सहा-सात तास भिजत ठेवतात. त्यानंतर द्रावणातून काढून हे आले छोट्याशा व बंद खोलीत पसरून ठेवतात. बंद खोलीत आल्याच्या कंदाला १२ तास गंधकाची धुरी देतात. थोडक्यात, बंद खोलीत गंधक जळत ठेवतात. त्यानंतर कंद बाहेर काढून दोन टक्के चुन्याच्या द्रावणात सहा तास भिजत ठेवतात व परत १२ तास गंधकाची धुरी देतात. अशाप्रकारे ही प्रक्रिया तीन वेळा करावी लागते, त्यामुळे आल्याच्या कंदांस पांढराशुभ्र रंग येतो. हे प्रक्रिया केलेले आले सूर्यप्रकाशामध्ये वाळवले जाते व गोणपाटामध्ये घालून स्वच्छ केले जाते. हेच आले सुंठ म्हणून बाजारात पाठविले जाते.सोडा व खास मिश्रण पद्धती : या पद्धतीने सुंठ तयार करण्यासाठी आले सर्वप्रथम स्वच्छ निवडून घ्यावे.

राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत

# नागरिकांसाठी थंडगार फिल्टर पाणी व पशुपक्ष्यासाठी स्वतंत्र व्यवस्था

## गटविकास अधिकारी यांचा स्तुत्य उपक्रम

मंठा । प्रतिनिधी

सध्या उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून मंठा शहराच्या उत्तरेस माळरानावर असलेल्या पंचायत समितीमध्ये सर्वसामान्य जनतेला पाणी पिण्यासाठी गटविकास अधिकारी संतोष गगनबोने यांनी स्वखर्चाने थंडगार फिल्टर पाण्याची व्यवस्था केली आहे. तसेच पशुपक्ष्यांसाठी स्वतंत्र व्यवस्था केल्यामुळे अनेक पक्षी आपली तहान भागविण्यासाठी प्रांगणातील झाडावर येतात. मंठा पंचायत समिती कार्यालयात जाण्यासाठी रस्त्याची व्यवस्था नाही, शिवाय ग्रामीण भागातून आलेल्या जनतेला पिण्यासाठी पाणी नसल्यामुळे नागरिकांचे प्रचंड प्रमाणावर हाल होत होते.



या संदर्भात गटविकास अधिकारी श्री गगनबोने यांनी पुढाकार घेत पंचायत समिती कार्यालयावर १००० लिटरच्या प्रत्येकी सहा पाण्याच्या टाक्या बसवून नागरिकांसाठी फिल्टर पाण्याची व्यवस्था केली आहे. त्यामुळे कामानिमित्त उन्हातान्हातून आलेले नागरिक आपली तहान भागवीत असून त्यांना दिलासा मिळत आहे. श्री गगनबोने व कर्मचाऱ्यांनी सर्वसामान्य जनतेला पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तर केलीच परंतु पशु पक्षांना सुद्धा पाणी पिण्यासाठी पंचायत समिती कार्यालयाच्या प्रांगणात असलेल्या झाडावर टाकाऊ वस्तु पासून पिण्याच्या पाण्याच्या कुंडया तयार करून लटकविल्या आहेत. त्यामुळे अनेक पक्षी आपली तहान भागविण्यासाठी झाडाचा आसरा घेतात. त्यामुळे भर उन्हाळ्यातही पशु पक्षांचा किलबिलाट ऐकावयास मिळत आहे. गटविकास अधिकारी श्री गगनबोने यांच्या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. पंचायत समिती वरील पाण्याच्या टाक्या भरण्याचे व पशुपक्षांना असलेल्या पाणी टाकण्याचे काम हवालदार पी जी राठोड हे करतात.

# मिडसांगवीत निगमानंद महाराज नारळी सप्ताहामध्ये हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश



पाथर्डी प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील मिडसांगवी येथे सुरू असलेल्या श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गढ निमगाव निगमानंद महाराज यांनी प्रारंभ केलेल्या ४८ व्या नारळी सप्ताहात एक सुंदर दृश्य पाहायला मिळाले मीडसांगवी येथील मुस्लिम समाजाने सप्ताहासाठी १ लाख २९ हजार रुपयांचा निधी देऊन भव्य अन्नदान केले मुस्लिम बांधवांनी स्वतःउपस्थित राहून प्रसादाची पंगत वाढवण्याची सेवाही केली मुस्लिम समाज या नारळी सप्ताहामध्ये सात दिवस श्रमदान करणार आहे समाजात बंधुभाव आणि एकतेचा संदेश या नारळी सप्ताहाच्या धार्मिक कार्यक्रमाच्या निमित्ताने देण्यात आला गावातील हिंदू बांधवांनी या कार्याबद्दल मुस्लिम समाजाचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिक दत्तू नाना पठाडे सरपंच भगवान हजारे भाजपचे युवा नेते महेश हजारे युवा नेते धनंजय पठाडे अनिल जाधव राम पठाडे माउली सुळ विष्णुपंत घोंगडे मुस्ताक शेख शौकत शेख बिलाल शेख मुहम्मद शेख आय्याझ शेख खालिल शेख जहुर शेख दिलावर शेख अस्लम शेख मुहम्मद रफिख शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

# क्रीडा स्पर्धाचे उद्घाटन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते संपन्न

जालना। प्रतिनिधी

जालना येथील पोलीस कवायत मैदानावर मंगळवार दि.२४ मार्च रोजी महसूल विभागाच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली आणि पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांच्या प्रमुख उपस्थितीत या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महसूल विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांनी शिस्तबद्ध संचलन करून आपल्या एकतेचे आणि शिस्तीचे दर्शन घडवले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.



जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांनी आकाशात रंगीबेरंगी फुगे सोडून स्पर्धांचे रीतसर उद्घाटन केले.

उद्घाटनानंतर अ‍ॅथलेटिक्स स्पर्धांना सुरुवात झाली. यामध्ये पुरुष व महिला प्रवर्गासाठी १०० मीटर आणि ४०० मीटर धावण्याच्या शर्यती पार पडल्या. महसूल कर्मचाऱ्यांच्या फुटबॉल मॅचने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. मैदानी खेळांसोबतच बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुद्धिबळ, कॅरम आणि लॉन टेनिस यांसारख्या इनडोअर गेम्समध्येही कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. याप्रसंगी बोलताना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले. तसेच कामाच्या व्यापातून वेळ काढून कर्मचाऱ्यांनी दाखवलेले क्रीडा कौशल्य आणि शिस्त कौतुकास्पद आहे. येत्या ३ ते ५ एप्रिल दरम्यान नांदेड येथे होणाऱ्या विभागीय महसूल क्रीडा स्पर्धेत जालना जिल्ह्याची कामगिरी सर्वोत्तम राहील, असा मला विश्वास आहे. असे सांगून त्यांनी सर्व खेळाडूंना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी जिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, नायब तहसीलदार तसेच महसूल विभागाचे कर्मचारी व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सी.एन.जी.पाईपलाईनचे काम बंद करून काम गावाबाहेरून करण्याची मागणी

मंठा। प्रतिनिधी

मंठा उस्वद रोडवर सीएनजी गॅस पाईपलाईनचे काम सुरू असून सदरील कामाचे मटेरीयल रस्त्यावर टाकल्याने (ता. २२) रोजी खोरवड पाटीवर झालेल्या अपघातात दोन जणांना आपला प्राण गमावावा लागला.त्यामुळे उस्वद येथील ग्रामस्थांनी एकत्रित येऊन महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड नांदेड या कंपनी मार्फत सुरू असलेले गॅस पाईपलाईनचे काम तात्काळ थांबवण्यात यावे व ही पाइपलाइन गावाच्या बाहेरून करण्यात यावी अशी मागणी मा.जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, सदरील कंपनीच्या वतीने पाईपलाईन टाकत असताना गंभीर चुका करण्यात येत आहेत.जसे की,खोदकामाचे मटेरीयल मुख्य डांबर रस्त्यावर टाकणे, रस्त्यावरील ये जा करणाऱ्या वाहनांना अडथळा निर्माण करणे, स्कुल बसला अडथळा निर्माण करणे, रस्साच्या कडेला सुचना फलक किंवा बॅरिकेट न लावणे, रस्त्याच्या कडेला कंम्पनीची वाहणे उभी करून अपघातास कारणीभूत ठरणे, गावातील नागरीकांना व शाळेतील विद्यार्थ्यांना ये जा करण्यास अडथळा निर्माण करणे, अशा नियमबाह्य कामामुळे दि. २२/०३/२०२६ रोजी दुपारी ५ दरम्यान उस्वदवरून मंठा शह राकडे जात असतांना मोटारसायकलचा आपघात होवुन त्यात दोन इसमांचा मृत्यु झाला. गावातील नागरीकांनी संबंधीत कंम्पनीला अडथळा दुर करण्यास सांगीतले असता अरेरावीची भाषा वापरून कंपनी चालक व त्यांचे कर्मचारी मनमानी करत असल्याने मा.जिल्हाधिकारी यांनी संबंधीत कंम्पनीची चौकशी करून तात्काळ कांम बंद करावे असे निवेदनात शेवटी म्हटले आहे. निवेदनावर सरपंच कमलबाई उद्धवराव सरोदे, वसंतराव राऊत, जगनराव घेटे, रंगनाथ कांबळे,विवेक राऊत, अनिल राऊत, संतोष कांबळे यांच्यासह अनेकांच्या सह्या आहेत.

# आत्महत्या करून जीवन वाया घालवू नका- शास्त्री महाराज

### बोरगाव अर्ज येथे अखंड हरिनाम सप्ताहानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम



फुलंब्री। प्रतिनिधी

येथे श्रीराम नवमी व हनुमान महाराज जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व संगीतप्रधान हनुमान चरित्र कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी कथा प्रवक्ते ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज शेवगावकर हे आपल्या अमृतमय वाणीतून हनुमान चरित्राचे निरूपण करणार आहेत. येथील छत्रपती संभाजी महाराज चौक परिसरात मागील १९ वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा अखंडपणे सुरू असून, याही वर्षी गुरुवार (२६ मार्च) पासून सप्ताहास प्रारंभ होणार आहे. गुरुवार (२ एप्रिल) रोजी ह.भ.प. रामेश्वर महाराज पवार यांच्या काल्याच्या कीर्तनाने व महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होणार आहे.

सप्ताहादरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, दररोज पहाटे ५ ते ७ काकडा भजन, सकाळी ११ ते सायंकाळी ५ संगीतप्रधान हनुमान चरित्र कथा, सायंकाळी नित्यनेम हरिपाठ तसेच रात्री ९ ते ११ या वेळेत हरिकीर्तन होणार आहे. उपस्थितीचे आवाहन आहे. प्रतिनिधी । फुलंब्री परमेश्वराने आपल्याला अनमोल असे जीवन दिले आहे. मात्र, काही लोक नैराशात गेले की आत्महत्या करून अनमोल जीवन वाया घालवतात. तुम्हाला जर कधी नैराश्य आले असेल तर फक्त एक तास शांत बसून हरिनामाचा गजर करावा. हरी नामामध्ये खूप मोठी शक्ती आहे, असे प्रतिपादन एकनाथ महाराज चत्तर शास्त्री यांनी येथे केले. फुलंब्री तालुक्यातील बोरगाव अर्ज येथे गुढीपाडव्यापासून भव्य कीर्तन सोहळ्यास सुरुवात झाली असून, शुक्रवार (२० मार्च) रोजी आयोजित कीर्तन सेवेत ते बोलत होते. आपल्या वाट्याला आलेले काम प्रामाणिकपणे करा, तीच खरी भक्ती असून, प्रामाणिकपणे जर तुम्ही तुमचे काम करत राहिले तर तुम्हाला कधीच कमी पडणार नाही. सध्याचे तरुण व्यसनाधीन झाले असून, त्यांना आई-वडिलांचा विसर पडला आहे. जो आई-वडिलांची सेवा करेल त्याला परमेश्वर कधीच कमी पडू देणार नाही. तरुणांनी आई-वडीलांची सेवा करावी, जीवनात कितीही अपयश आले तरी खचून जाऊ नये.अपयश ही यशाची पहिली पायरी असते. त्यामुळे पुन्हा नव्या ताकदीने आणि जिद्दीने यशासाठी प्रयत्न करावेत. नैराश्य आले तरी आत्महत्येचा मार्ग स्विकारू नये. जीवन एकदाच मिळते.त्यामुळे नैराश्य आले तर हरी नामाचा जप करावा, त्यामुळे नैराश्य दुर होण्यास मदत होते, असेही एकनाथ महाराज यांनी सांगितले. यावेळी परिसरातील भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सप्ताहानिमित्ताने बोरगालव अर्ज येथे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडत आहेत.

# खरवंडी कासार येथे रामनवमीनिमित्त भव्य शोभायात्रा

### आ.संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत होणार सकल हिंदू एल्गार महासभा

पाथर्डी प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार येथे गुरुवार २६ मार्च २०२६ रोजी मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्रीरामचंद्रप्रभूंची जयंती खरवंडी कासार लोकनेते गोपीनाथ मुंडे चौकात साजरी करण्यात येणार आहे अशी माहिती विश्व हिंदू परिषदेचे प्रखंड सहमंत्री गणेश जवरे यांनी दिली आहे श्रीरामनवमीनिमित्त खरवंडी कासार येथे रक्तदान शिबिर व भव्य शोभायात्रा अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे रामचंद्रप्रभू जयंतीनिमित्त भगवानगड परिसरातील शेतकरी कष्टकरी ऊसतोड मजुरांसाठी रक्तदान शिबिर नेत्र शिबिर आयोजित करण्यात आले असून या शिबिराचा लाभ हिंदू बांधवांनी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे या कार्यक्रमासाठी अहिल्यानगर शहर मतदारसंघाचे आमदार संग्राम भैय्या जगताप उपस्थित राहणार असून सकल हिंदू समाजाच्या वतीने हिंदू महा एल्गार सभा होणार असल्याने श्रीराम निमित्त सकल हिंदू समाजाने मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



जालना : शहर महानगरपालिकेला शासनातर्फे धूळ ओढण्याच्या तीन मशीन व एक बुलडोझर व दोन घंटा गाड्या उपलब्ध झाल्या असून याचे उद्घाटन जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी महानगरपालिका चे महापौर वंदना मगरे हजर होते.

# राज्यात प्रथम क्रमांकाने सन्मानित जिल्हा प्रशासनातील गुणवत्ता व उत्कृष्टतेचा सन्मान

जालना। प्रतिनिधी

जिल्हा निर्देशांक या उपक्रमाचे यंदा चौथे वर्ष असून सांख्यिकी विभागाकडे असलेल्या तपशिलाच्या आधारे पुणे येथील विख्यात गोखले अर्थशास्त्र संस्थेकडून विविध जिल्ह्याच्या कामगिरीचे विश्लेषण केले गेले.

त्यानूसार जालना जिल्ह्याने विविध विकास निर्देशांकाबाबत प्रथम क्रमांक नोंदविला आहे. त्यानूसार जालना जिल्ह्याने उत्कृष्ट कामगिरी करत 'गट-१' मध्ये राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या कार्यक्रमाचे आयोजन दि.२० मार्च २०२६ रोजी हॉटेल ताज विवांता मुंबई येथे करण्यात आले होते. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध निकषांवर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार केला.

विशेषतः प्रशासकीय गतिमानता आणि लोककल्याणकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्यात जिल्हा प्रशासनाला मोठे यश आले आहे. या लक्षणीय यशाबद्दल जिल्ह्याचा विशेष सन्मान करण्यात आला असून जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी हा मानाचा पुरस्कार व सन्मानचिन्ह स्वीकारले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सिध्देश्वर अंभूरे यांची निवड

परतूर । प्रतिनिधी

परतूर तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष पदी सिध्देश्वर अंभुरे यांची निवड मा.आ.सुरेशकुमारजी जेथलिया यांच्या प्रमुख उपस्थितीत व युवक जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली सरकटे यांच्या अध्यक्षते खाली करण्यात आली.यावेळी राष्ट्रवादी युवक प्रदेश सरचिटणीस नितीन जेथलिया, तालुकाध्यक्ष बाबासाहेब गाडगे,इंद्रजित घनवट,सोनू धुमाळ, गणेश ढवळे,बाळू अंभुरे,अक्षय अंभुरे,उदय नेब, योगेश



अंभुरे,सौरभ अंभुरे,अमन अंभुरे,निखिल अंभुरे इत्यादी उपस्थित होते.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/२७०
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०४/०३/२०२६

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) उषा राजेंद्र घोलप २.रंजित राजेंद्र घोलप रा. अंबड सिटी सर्व्हे नं. ८३३ नं.प.घर क्रमांक ७-५३ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (७-५३) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- रस्ता
पश्चिम : सर्जेराव रांजणे यांची जागा
दक्षिण- हिवाळे यांचे घर
उत्तरः रस्ता

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# भाजपा कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण महाअभियान

घनसावंगी। प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीच्या वतीने घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील भाजपा कार्यकर्त्यांसाठी 'पंडित दीनदयाल उपाध्याय निवासी प्रशिक्षण महाअभियान-२०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. हे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर शनिवार, २८ मार्च २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता संजीवन ध्यान समाधान केंद्र, मच्छिंद्रनाथ चिंचोली (ता. घनसावंगी) येथे सुरू होणार आहे. या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन माजी केंद्रीय मंत्री तथा ज्येष्ठ नेते रावसाहेब पाटील दानवे व प्रदेश सचिव रेखा कुलकर्णी यांच्या यांच्या हस्ते संपन्न होईल. या कार्यक्रमाला भाजपा जिल्हाध्यक्ष तथा आमदार नारायणराव कुचे, माजी आमदार विलासबापू खरात यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. अशी माहिती घनसावंगी विधानसभेचे निवडणूक प्रमुख सतीश घाटगे यांनी दिली.

घनसावंगी विधानसभेतील रांजणी, शहागड आणि घनसावंगी अशा तिन्ही मंडळातील कार्यकर्त्यांसाठी हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या निवासी शिबिरात पक्षाचा इतिहास, सरकारची कामगिरी, बूथ व्यवस्थापन, संघटन विस्तार तसेच सोशल मिडिया व एआय या विषयांवर विविध तज्ज्ञ वक्ते मार्गदर्शन करणार आहेत. यामध्ये दीपक भैया ठाकूर, डॉ. राजू निवृत्ती साळवे, राजेश मोरे आणि गोविंद ढेंबरे यांचा समावेश आहे. रविवार २९ मार्च रोजी सकाळी ११:०० वाजता माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रमुख उपस्थिती या शिबिराचा समारोप होणार आहे. दुसऱ्या दिवशीच्या सत्रात वैचारिक अधिष्ठान आणि सोशल मीडिया, एआय व नमो ॲप या तांत्रिक विषयांवर सुरेश केसापुरकर आणि विकास कदम हे मार्गदर्शन करतील. पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारांची शिदोरी प्रत्येक कार्यकर्त्यापर्यंत पोहोचवण्यासाठी हे शिबीर आयोजित करण्यात आले असून, या शिबिरात कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कार्यक्रमाचे मुख्य संयोजक सतीश घाटगे पाटील यांनी केले आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
गुरुवार दि.२६ मार्च २०२६


# बीड शहरातील ओढे-नाले भूमाफियांना आंदण

## बीड नगरपालिकेची डोळेझाक,जिल्हा प्रशासनाचा 'विवेक' कधी जागा होणार

बीड । प्रतिनिधी

बीड शहरांमधील अनेक वादग्रस्त त्यासोबत ओढे आणि नाले यावर भूमाफियाने कब्जा केल्याचे दिसत आहे विशेषतः शहरातून जाणारे मोठ्या नाल्यावर अतिक्रमण करून ४० फुटाचे ओढे दहा फुटावर आणलेले आहेत याप्रकरणी नगरपालिका मात्र झोपेचे सोंग घेत असून जिल्हा प्रशासन सद्विवेक बुद्धीने कधी कारवाई करणार मात्र तसे होत नसताना दिसत आहे

बीड शहरातून अनेक मोठमोठे ओढे आणि नाले जात आहेत मात्र यावर भूमाफी यांनी आपला डोळा पूर्वीपासूनच ठेवलेला





दिसत आहे बीड शहरातील मोंढा भागामध्ये जुन्या चिंचाच्या झाडाच्या पाठीमागील बाजूस असलेल्या ओढ्यावरच एकाने टोलिजंग इमारत उभी केली आहे या इमारतीचे बांधकाम सुरू असताना प्रशासनाला हे दाखवण्यात आले होते विशेषता नगरपालिका आणि भूमी अभिलेख कार्यालय यांच्याकडे रीतसर माहिती असताना देखील केवळ चौकशीचे नाटक करून पुढे काहीच कारवाई झाली नाही मुंढा भागातून जाणारा हा मोठा नाला आता अगदी नाली झालेली दिसत आहे दुसरीकडे बार्शी नाका भागात बार्शी नाका चौक नाळवंडी नाक्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर मुख्य रस्त्यामधूनच मोठा नाला जात आहे हा नाला पूर्वी ३५ फुटापर्यंत होता परंतु आता त्यावर ही अतिक्रमण करत दहा ते पंधरा फुटाचाच माला ठेवला गेला आहे यासोबतच अंकुश नगर भागात ही अशीच परिस्थिती आहे त्याही भागातून जाणारा पूर्वीचा मोठा ओढा किंवा नदी म्हणता येईल या नदीलगत भूमाफियांनी अतिक्रमण करून मोठमोठी घरे बांधली ◀◀ पान ३ वर

### मोंढा –बार्शी नाका आणि अंकुश नगर

बीड शहरातील मोंढा भागामध्ये मोठ्यातून एमआयडीसी कडे जाताना लागणाऱ्या ओढ्या वरील पुलालगतच भव्य अशी इमारत उभी झाली आहे ती इमारत अर्धी नाल्यावरच दिसत आहे दुसरे बार्शी नाका ते तेलगाव टाका या दरम्यान असलेल्या मोठ्या नाल्यावर दोन्ही बाजूने अतिक्रमण करून नाल्याची दिशाच बदलली आहे यासोबतच अंकुश नगर भागाकडे जाताना असलेले नदीचे पात्र तर अगदी भूमात यांनी कमी केले आहे याकडे प्रशासन कधी लक्ष देणार अशी मागणी होत आहे

# चोऱ्या,घरफोड्या करणारे तिघे तीन जिल्हयातून हद्दपार

## पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांची कारवाई

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी बीड जिल्हयाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर बीड जिल्हयात होत असलेल्या चोऱ्या, घरफोड्या, खुन व खुनाचा प्रयत्न, दंगा, जबरी चोऱ्या, दरोडा टाकणारे गुन्हेगारांना प्रतिबंध करुन शांतता प्रस्थापित करण्यासाठी बीड पोलीस दलाकडुन विशेष मोहिम राबविण्यात येत आहे त्यासाठी बीड जिल्हयातील गुन्हेगारावर बीड पोलीसांची पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या सुचनेवरुन करडी नजर आहे. असे गंभीर गुन्हे करणारे गुन्हेगारांच्या टोळयावर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी त्यांचे विरुध्द जास्तीत जास्त उचित प्रतिबंधक कारवाया करणे बाबत पो.स्टे. प्रभारी





अधिकाऱ्यांना सुचना दिलेल्या आहेत.

पो.स्टे. प्रभारी अधिकारी पेठ बीड मारोती खेडकर यांनी बीड जिल्हयात टोळीने गुन्हे करणारे १. भिमा लक्ष्मण मस्के वय-४४ वर्षे रा. वतारवेस पेठ बीड ता.जि. बीड (टोळी प्रमुख) २. अविनाश कल्याण धुरधरे वय-३८ वर्षे रा. मादळमोही ता. गेवराई जि.बीड ह.मु.काळा हनुमान ठाणा चांदणेवस्ती पेठ बीड ता.जि.बीड (टोळी सदस्य) ३. विपुल ◀◀ पान ३ वर

# अवैध दारु विक्री विरोधात पेठ बीड पोलीसांची कार्यवाही

बीड । प्रतिनिधी

दिनांक २५ मार्च रोजी ११.०० वाजता आरोपी सचिन विठ्ठल वादे वय- ३८ वर्ष रा. नालवंडी ता. जि. बीड हा त्याचे टी.व्ही.एस. ईलेक्ट्रीक स्कुटी क्र. -२३-- ४८३६ यामध्ये अवैध विनापरवाना बेकायदेशीररीत्या विदेशी दारु विक्री करीता घेवुन जात असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यावरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे सापळा रचुन पोलीस ठाणे पेठ बीड चे अंमलदार यांनी कारवाई केली.

या रेडमध्ये आरोपी सचिन



विठ्ठल वादे याचे ताब्यातुन एकुन ११७,९००/- रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करुन नमुद आरोपीविरुद्ध पोलीस ठाणे पेठ बीड येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोह/१८३५ अजित हे करीत असुन सदरची कारवाई पोलीस ठाणे पेठ बीड पोलीस निरीक्षक मारोती खेडकर यांचे मार्गदर्शनाखाली पोह/१८३५ अजित, पोअं/२२१८ विष्णु, पोअं/१५५१ पांडुरंग, पोअं/१९६० अल्ताफ पोअं/१९८७ गिरी यांनी केली आहे.

# मच्छिंद्रनाथ गडावर चोख बंदोबस्त

## अंभोरा पोलीस ठाण्याचे सपोनि मंगेश साळवे यांचा जिल्हा पोलीस अधीक्षकांकडून गौरव

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील श्री. क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान, मायंबा येथे गुढीपाडव्यानिमित्त झालेल्या अलोट गर्दीत कायदा व सुव्यवस्था उत्कृष्टरित्या राखल्याबद्दल बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी अंभोरा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक मंगेश भागवत साळवे यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविले आहे.

दिनांक १८ मार्च २०२६ रोजी गुढीपाडव्याच्या



मुहूर्तावर मायंबा गडावर राज्यातील विविध जिल्ह्यांमधून अंदाजे १० ते १२ लाख भाविक दर्शनासाठी आले होते. एवढ्या मोठ्या संख्येने जनसमुदाय जमलेला असताना शांतता राखणे आणि गर्दीचे नियोजन करणे हे पोलीस प्रशासनासमोर मोठे आव्हान होते. ◀◀ पान ३ वर

# पोलीस भरतीची रिक्त पदानुसार तात्पुरती निवड यादी प्रसिध्द

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील सन २०२४-२५ मध्ये रिक्त असणाऱ्या १७४ पोलीस शिपाई पदांसाठी दिनांक ११ते दिनांक १८ फेब्रुवारीपर्यंत मैदानी चाचणी प्रक्रिया व दिनांक १५/०३/२०२६ रोजी ११.०० ते १२.३० वा. दरम्यान लेखी परिक्षा आयोजित करण्यांत आलेली होती.

मैदानी चाचणी व लेखी परिक्षा मध्ये प्राप्त एकत्रित गुणांच्या आधारे रिक्त पदांनुसार तात्पुरती निवड यादी व तात्पुरती प्रतिक्षा यादी शासन निर्णय दिनांक १०/१२/२०२० व शासन निर्णय दिनांक २५/०१/२०२४ रोजीचे शासन निर्णयातील तरतुदीनुसार यासोबत प्रसिध्द करण्यांत येत आहे. सदरची यादी सर्व उमेदवार यांचे आवेदन अर्जामध्ये नमुद प्रमाणे सर्व मुळ कागदपत्रे व समांतर आरक्षण बाबतचे सर्व कागदपत्रे पडताळणी करण्यांचे अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात निर्गमित करण्यांत येत आहे.

तात्पुरती ◀◀ पान ३ वर

# ॲड.रवींद्र कानडे समाज भूषण पुरस्काराने सन्मानित

माजलगाव । प्रतिनिधी

तुळजापूर येथे लिंगायत महासंघ द्वारा आयोजित लिंगायत समाज अधिवेशनामध्ये माजलगाव शहरातील श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे व्यवस्थापकीय संचालक ॲड.रवींद्र कानडे यांना दि २२ मार्च २०२६ रोजी समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

श्री मंगलनाथ संस्थेला २५ वर्षे पूर्ण झालेली आहे या २५ वर्षाच्या कालावधीमध्ये सभासद व नागरिक यांच्या विश्वासास



पात्र राहून कार्य करत समाजातील विविध दुर्बल घटकांना आर्थिक सहाय्य करून त्यांना आत्मनिर्भर आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचे कार्य संस्थेच्या वतीने करण्यात आले त्याचबरोबर केवळ व्यवसायास प्राधान्य न देता सामाजिक बांधिलकी जपण्याचा उद्देश ◀◀ पान ३ वर

# श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचा ४८ वा नारळी सप्ताह मिडसांगवी येथे सुरू


## ३० मार्च रोजी होणार सांगता, महंत जनार्दन महाराजांचे मार्गदर्शन

बीड । प्रतिनिधी

मिडसांगवी येथे श्रीक्षेत्र मच्छिंद्रगड संस्थान निमगाव (मा) तालुका शिरूर कासार जिल्हा बीड यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला ४८ वा वार्षिक फिरता नारळी सप्ताह मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात सुरू झाला आहे. ब्रह्मलीन संत निगमानंद महाराज यांच्या कृपा छत्राखाली तसेच



महंत स्वामी जनार्दन महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा धार्मिक सोहळा पार पडत असून, संत-महंत, आणि हजारो



भाविकांच्या उपस्थितीत पुष्पवृष्टी कार्यक्रमाने सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला.

सदर सप्ताहाच्या निमित्ताने दररोज पहाटे काकडा भजन, विष्णुसहस्रनाम, गीता पाठ, ज्ञानेश्वरी पारायण, तुकाराम महाराज गाथा भजन, रामायण कथा, प्रवचन, हरिकीर्तन आणि जागर यांसारख्या विविध धार्मिक कार्यक्रमांचे ◀◀ पान ३ वर

# पोलिसांच्या मदतीने तीन अल्पवयीन मुलींची घर वापसी

बीड । प्रतिनिधी

मागील दोन महिन्यांच्या कालावधीत घरातून निघून गेलेल्या तीन अल्पवयीन मुलींचा शोध घेऊन त्यांचे समुपदेशन करून सुरक्षितपणे घरी परत पाठवण्यात बीड शहर पोलिसांना यश आले आहे.

यातील तिसऱ्या मुलीचा शोध नांदेड शहरातून घेण्यात आला. विशेष बाब म्हणजे संबंधित मुलगी स्वतः मोबाईल वापरत नव्हती, त्यामुळे तिचा मागोवा घेणे अत्यंत आव्हानात्मक ठरले. मात्र, एका अनोळखी व्यक्तीचा मोबाईल वापरून तिने इंस्टाग्रामवरून एका मित्राला संदेश पाठवला होता. त्या मित्रालाही तिची ओळख नव्हती, त्यामुळे तपास अधिक गुंतागुंतीचा झाला.

सदर संदेशात तिने नांदेड येथे असल्याचे संकेत दिले होते. त्यानुसार नांदेड पोलिसांची मदत घेऊन शोधमोहीम राबविण्यात आली. स्थानिक माहितीदारांच्या मदतीने ती एका



विद्यार्थिनीच्या रूमवर राहत असल्याची माहिती मिळाली आणि पोलिसांनी तत्काळ कारवाई करून मुलीला ताब्यात घेतले.

मुलगी शोधल्यानंतर तिचे कुटुंबाशी पुनर्मिलन करून घरी परत पाठवणे हे आणखी मोठे आव्हान असते. अनेक वेळा मुली घरच्यांविरुद्ध बंड करून शासकीय वसतिगृहात राहण्याचा पर्याय निवडतात. अशा वेळी पोलिस आणि बालकल्याण विभाग यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. बीड शहर पोलिसांनी प्रभावी समुपदेशन व समन्वय साधून तीनही मुलींची यशस्वी घरवापसी केली आहे. तपासादरम्यान असे निदर्शनास आले की, किशोरवयीन मुलींसोबत पालकांनी संवाद साधताना समजून घेण्याऐवजी कठोर भूमिका घेतली जाते. योग्य संवादाचा अभाव, तसेच सोशल मीडियाचा प्रभाव यामुळे मुली घरापासून दूर जाण्याची शक्यता वाढते. याबाबत पालकांनी सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव, पोलीस अंमलदार गहिनीनाथ बावनकर, मंगेश शिंदे, राम पवार यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.



**पाटोदा : बीड जिल्ह्याचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या हस्ते पाटोदा पोलीस ठाण्यात वृक्षारोपण करण्यात आले यावेळी पाटोदा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद घोळवे,सहाय्यक पोलीस निरीक्षक भगवान भाबड,पोलीस उपनिरीक्षक शैलेश पवार,पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब वाघ उपस्थित होते.तसेच नगराध्यक्ष राजूभैय्या जाधव,पाटोदा पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे,सचिव एडोकेट महेश बेदरे यांच्यासह पोलीस कर्मचारी रियाज पठाण,पवळ,राणी मेंगडे,पवार मॅडम, कोळेकर आणि इतर अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# उज्वला योजनेच्या नावाखाली बीडमध्ये घोटाळा ?

## लाभार्थ्यांची फसवणूक, सबसिडीचा संशयास्पद अपहार, प्रशासन मात्र गप्प !

बीड । प्रतिनिधी

केंद्र शासनाची प्रधानमंत्री उज्वला योजना ही गरीब व वंचित कुटुंबांना मोफत एलपीजी गॅस कनेक्शन देण्यासाठी राबविण्यात येत असून, महिलांचे सक्षमीकरण, आरोग्य संरक्षण आणि पर्यावरण संवर्धन हा तिचा मुख्य उद्देश आहे. मात्र बीड तालुक्यात या योजनेच्या अंमलबजावणीत गंभीर अनियमितता झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

बीडमधील प्रदीप गॅस एजन्सीने ग्रामीण भागात कॅम्प घेऊन लाभार्थ्यांकडून बीपीएल कार्ड, आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुक, मोबाईल नंबर आणि फोटो यांसारखी कागदपत्रे गोळा केली. मोफत गॅस कनेक्शन देण्याचे आश्वासन देण्यात आले

### जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी लक्ष देणार की स्टंट करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले

मात्र प्रत्यक्षात अनेक लाभार्थ्यांना आजपर्यंत गॅस कनेक्शन मिळालेले नाही. या प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे काही लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर गॅस सबसिडी जमा होत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे बनावट नोंदी करून आर्थिक गैरव्यवहार झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या संदर्भात मा. जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांनी २३ मार्च २०२१ रोजी चौकशीचे आदेश दिले होते. तसेच मा. तहसीलदार, बीड यांनी ३१ मार्च २०२२ रोजी मंडळ अधिकारी व तलाठी यांच्या मार्फत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. तरीही आजपर्यंत कोणतीही ठोस कारवाई किंवा चौकशी पूर्ण झालेली नाही, ही प्रशासनाची गंभीर निष्क्रियता असल्याची टीका होत आहे.

दरम्यान, मंडळ अधिकारी सचिन सानप यांनी चौकशीदरम्यान एजन्सीकडून माहिती मागवली असता, प्रदीप गॅस एजन्सीकडून माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात आल्याचेही समोर आले आहे. हे शासन आदेशाचा अवमान असल्याचे मानले जात आहे. या संपूर्ण प्रकरणात लाभार्थ्यांची फसवणूक, योजनेंतर्गत लाभ न देणे, बनावट नोंदीद्वारे सबसिडी अपहार, तसेच महसूल अधिकाऱ्यांची हलगर्जीपणा आणि निष्क्रियता असे गंभीर मुद्दे पुढे आले आहेत. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित प्रदीप गॅस एजन्सीचा परवाना तात्काळ निलंबित किंवा रद्द करावा. तसेच लाभार्थ्यांची यादी तपासून ज्यांना गॅस कनेक्शन मिळालेले नाही त्यांना तातडीने लाभ द्यावा आणि सबसिडी गैरव्यवहाराबाबत आर्थिक चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हा दाखल करावा. गेल्या ३ ते ४ वर्षांपासून या प्रकरणाचा पाठपुरावा सुरू असूनही कारवाई होत नसल्याने, आता लोकायुक्त व न्यायालयीन मार्गाचा अवलंब करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

गुरूवार दि.२६ मार्च २०२६ | पान ७

# ड्रग्जच्या विळख्यात पुणे.! २२ पोलिस ठाण्यांमध्ये अमली पदार्थांचा सुळसुळाट; पोलिसांचा मेगा ॲक्शन प्लॅन सुरू

**पुणे । प्रतिनिधी**



पुणे शहरात अमली पदार्थांचा विळखा दिवसेंदिवस घट्ट होत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. पोलिसांच्या कारवाईच्या सखोल विश्लेषणातून शहरातील तब्बल २२ पोलिस ठाण्यांच्या हद्दीत ड्रग्जची तस्करी आणि विक्री मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचे उघड झाले आहे. या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी आता 'ड्रग फ्री पुणे' या मोहिमेअंतर्गत व्यापक आणि आक्रमक कारवाईचा धडाका सुरू केला आहे.

मंगळवारी (दि. २४) पोलिस आयुक्तालयात झालेल्या गुन्हे आढावा बैठकीत पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्ट शब्दांत इशारा देत, शहरात अमली पदार्थांविरोधात निर्णायक लढा उभारला जाईल, असे सांगितले. या बैठकीस सह पोलिस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलिस आयुक्त आणि विविध विभागांचे उपायुक्त उपस्थित होते.

पोलिसांनी आखलेल्या नव्या रणनीतीनुसार, प्रत्येक झोन स्तरावर स्वतंत्र अमली पदार्थ विरोधी पथके तयार करण्यात येणार आहेत. या पथकांना विशेष प्रशिक्षण देऊन तस्करांवर थेट आणि समन्वयित कारवाई केली जाणार आहे. गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलिस ठाण्यांची संयुक्त मोहीम एकाचवेळी राबवली जाणार असल्याने तस्करांचे जाळे उद्ध्वस्त करण्याचा निर्धार पोलिसांनी व्यक्त केला आहे.

विशेष म्हणजे, आता पान टपऱ्या, लहान दुकाने आणि संशयित ठिकाणेही पोलिसांच्या रडारवर आली आहेत. शहरातील काही भागांमध्ये अशा ठिकाणांवरून अमली पदार्थांची विक्री होत असल्याचे आढळल्याने पोलिसांनी त्यांच्यावरही लक्ष केंद्रित केले आहे.

लक्ष्मीनगर, येरवडा, कोंढवा, काळेपडळ, डेक्कन, खडक, शिवाजीनगर, लष्कर, मुंढवा, वानवडी, लोहगाव, वाघोली, खराडी, लोणीकंद, खडकी, सहकारनगर, बाणेर, लोणीकाळभोर, वारजे माळवाडी, पर्वती आणि मार्केटयार्ड या भागांमध्ये अमली पदार्थांची हालचाल अधिक असल्याचे समोर आले आहे. संबंधित पोलिस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना ठोस कारवाईसाठी विशेष मॉडेल तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, नागरिकांचाही या मोहिमेत सक्रिय सहभाग असावा यासाठी पोलिस लवकरच विशेष मोबाइल प सुरू करणार आहेत. या पद्वारे नागरिकांना संशयास्पद हालचालींची माहिती गोपनीय पद्धतीने पोलिसांना देता येणार आहे. माहिती देणाऱ्यांची ओळख पूर्णपणे गुप्त ठेवली जाईल, अशी हमी पोलिसांनी दिली आहे. ड्रग्जविरोधातील ही लढाई केवळ पोलिसांची नसून संपूर्ण समाजाची आहे, असे आवाहन करत पोलिस प्रशासनाने नागरिकांना पुढे येण्याचे आवाहन केले आहे. पुणे शहराला ड्रग्जमुक्त करण्यासाठी आता प्रशासन आणि नागरिक यांची संयुक्त मोहीम निर्णायक ठरणार आहे.

# बेकायदेशीर बोअरवेल खोदल्यामुळे पुणे मेट्रोला धोका; खडक पोलीस ठाण्यासमोरील बोगद्यात अचानक पाणी गळती

**पुणे । प्रतिनिधी**



शिवाजीनगर ते स्वारगेटदरम्यानच्या भूमिगत मेट्रो बोगद्यात अचानक पाणी गळती सुरू झाल्याने प्रशासनात खळबळ उडाली. ही गळती बेकायदेशीर बोअरवेल खोदकामामुळे झाल्याचे स्पष्ट झाले असून, घरमालक आणि ठेकेदाराविरोधात निष्काळजीपणा, सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण करणे आणि सरकारी प्रकल्पाचे नुकसान केल्याप्रकरणी खडक पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. पुणे मेट्रोच्या सिव्हिल विभागाचे संयुक्त महाव्यवस्थापक शंतनु गोरात्रा यांनी दिलेल्या तक्रारीनुसार १४ मार्चला दुपारी ट्रेन ऑपरेटर भूषण बारिंगे यांनी कंट्रोल रुमला स्वारगेट ते मंडईदरम्यानच्या डाउन लाइनवर बोगद्यात पाणी झिरपत असून, ते थेट ट्रॅकवर येत असल्याची माहिती दिली. त्यानंतर अधिकाऱ्यांनी तातडीने बोगद्याची पाहणी केली.

मात्र, गळती कोठून होत आहे, हे स्पष्ट होत नसल्याने बोगद्याच्या वरच्या भागाची तपासणी केली. त्या वेळी शुक्रवार पेठेतील शिवाजी रोडवर, खडक पोलीस ठाण्यासमोर घर क्रमांक ४१५ येथे वाडा पाडून मोकळ्या जागेत बोअरवेल खोदल्याचे आढळले. चौकशीत ठेकेदार जगताप यांनी घरमालक धनंजय मोटे यांच्या सांगण्यावरून सुमारे ६० फूट खोल बोअरवेल खोदल्याचे सांगितले. यासाठी पुणे मेट्रोकडून परवानगी घेतलेली नव्हती. मेट्रो प्रशासनाने यापूर्वीच या भागात कोणतेही खोदकाम किंवा बोअरवेल घेऊ नयेत, असे स्पष्ट निर्देश दिले होते. या कामामुळे मेट्रोच्या बोगद्याच्या सिमेंट रिंगला सुमारे ६ इंच व्यासाचे छिद्र पडून पाणी थेट ट्रॅकवर झिरपू लागले. यामुळे अंदाजे अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. संबंधित बोगदे ६० ते १०० फूट खोल असून, अत्याधुनिक पद्धतीने वॉटरप्रूफ केलेले आहेत, तरीही या निष्काळजीपणामुळे संरचनेला धोका निर्माण झाला. दरम्यान, १७ मार्च रोजी गळती नियंत्रणात आणली असली, तरी धोका पूर्णपणे टळलेला नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. मेट्रो प्रशासनाने नागरिकांना इशारा दिला आहे की, मेट्रो मार्गाच्या वर कोणतेही खोदकाम किंवा बोअरवेल करण्यापूर्वी संबंधित परवानगी घेणे बंधनकारक आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल.

# कुलसचिवपदाची नियुक्ती गुलदस्त्यातच! विद्यापीठ प्रशासनाकडून अद्यापही अधिकृत घोषणा नाही

**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिवपदाच्या नियुक्तीचे गौडबंगाल वाढत असून, ही नियुक्ती अद्यापही गुलदस्त्यात आहे. डॉ. मनोहर सानप यांची या पदावर नियुक्ती झाल्याची जोरदार चर्चा असतानाच, विद्यापीठ प्रशासनाने अद्यापही अधिकृत घोषणा केलेली नाही. नियुक्तीचे पत्र दिल्याचे तोंडी सांगितले जात असले, तरी ते सार्वजनिक करण्यास टाळाटाळ केली जात असल्याने विद्यापीठ वर्तुळात अनेक तर्कवितर्कांना उधाण आले आहे. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी डॉ. सानप यांना नियुक्तीचे पत्र दिले असले, तरी त्यात काही 'जाचक' अटींचा समावेश असल्याचे सांगितले जात आहे. संबंधित संस्थेकडून ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी), कार्यमुक्तीचे पत्र आणि इतर कायदेशीर बाबी पूर्ण करण्यासाठी त्यांना एका महिन्याची मुदत देण्यात आली आहे.



अशा स्थितीत डॉ. सानप यांना ही सर्व प्रक्रिया पूर्ण करणे शक्य आहे का, हेच आता पाहावे लागणार आहे. येत्या शुक्रवारी होणाऱ्या अधिसभेत कुलसचिव नियुक्तीवरून गदारोळ निर्माण होऊ नये, त्यासाठीच ही घाईगडबड केल्याची चर्चा सुरू आहे.

# जैन कोहिनूर पुरस्काराने शोभाताई धारीवाल यांचा गौरव

**पुणे । प्रतिनिधी**

सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी शोभाताई रिसकलाल धारीवाल यांना प्रतिष्ठित 'जैन कोहिनूर' पुरस्कार प्रदान करण्यात आला. नवी दिल्ली येथील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सेंटरमध्ये आयोजित भव्य समारंभात हा पुरस्कार सोहळा संपन्न झाला.




हा सन्मान शतवर्षीय आचार्य श्री १०८ विद्यानंद जी मुनिराज यांचे शिष्य राष्ट्रसंत परमप्राचार्य श्री १०८ प्रज्ञासागर जी महाराज यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन श्री भारतवर्षीय दिगंबर जैन महिला महासभा या संस्थेमार्फत करण्यात आले होते. श्री भारतवर्षीय दिगंबर जैन महिला महासभा ही जैन समाजातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी, शिक्षण, सामाजिक जागृती आणि सेवाभावी उपक्रमांसाठी कार्यरत असलेली एक महत्त्वाची संस्था आहे. ही संस्था श्री भारतवर्षीय दिगंबर जैन महासभा या १९५४ साली स्थापन झालेल्या ऐतिहासिक संघटनेचा एक भाग आहे. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या विजया रहाटकर यांनी शोभाताई धारीवाल यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले. आर. एम. धारीवाल फाउंडेशनमार्फत राबविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवा, शिक्षण आणि समाजकल्याणाच्या विविध उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडत असल्याचे त्यांनी नमूद केले.

पुरस्कार स्वीकारताना शोभाताई धारीवाल यांनी महिला दिनाच्या महत्त्वावर भाष्य केले. त्या म्हणाल्या, आज आपण महिला दिन साजरा करत आहोत, तो अनेक समाजसुधारकांच्या अथक प्रयत्नांमुळे शक्य झाला आहे. महिलांच्या शिक्षणासाठी आणि त्यांच्या उन्नतीसाठी त्यांनी दिलेल्या लढ्याचे स्मरण केल्याशिवाय महिला दिन साजरा करणे अपूर्ण आहे. तसेच त्यांनी आजच्या महिलांनी पुढील पिढ्यांच्या घडणीत महत्त्वाची भूमिका पार पाडावी आणि मुलांना चांगले संस्कार देणे ही काळाची गरज असल्याचेही सांगितले. समारंभात भक्तिमय सादरीकरण, पारंपरिक संगीत आणि जैन तत्त्वज्ञानावर आधारित सादरीकरणांचाही समावेश होता.

# भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्या वाढदिवसानिमित्त ३०० रिक्षाचालकांना 'थंडगार पाणी पिशवी'चे वाटप




**पुणे । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे पुणे शहराध्यक्ष धीरज रामचंद्र घाटे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग २७ मधील सुमारे ३०० रिक्षाचालकांना नैसर्गिक 'थंडगार पाणी पिशवी'चे वाटप करण्यात आले. लोकमान्य नगर येथील दत्त मंदिर चौकात हा उपक्रम उत्साहात पार पडला.

रिक्षाचालक हे शहराच्या वाहतुकीतील महत्त्वाचा घटक असल्याचे नमूद करत स्व. गिरीश बापट यांनी सुरू केलेल्या 'ए रिक्षावाले नाही, तर ओ रिक्षावाला म्हणा' या उपक्रमाची आठवण घाटे यांनी करून दिली. 'उमेद चॅरिटेबल ट्रस्ट'च्या माध्यमातून हा उपक्रम प्रथमच राबविण्यात आल्याचे सांगण्यात आले. उन्हाळ्यात डिहायड्रेशन टाळण्यासाठी स्वच्छ पाण्याचे महत्त्व अधोरेखित करत प्लास्टिक बाटल्यांऐवजी नैसर्गिक पाणी पिशवी अधिक उपयुक्त ठरेल, अशी भावना विजय गायकवाड यांनी व्यक्त केली. या वेळी मनिषा घाटे, आनंद पाटील, सुनील खंडाळे, राजेंद्र फाटे, प्रशांत सुर्वे, संजय गावडे, अंकुश नवले, सुनील शिंदे, राम बडंबे, सुनिता जंगम, अनिकेत खेडेकर, अतुल पाटील, कमलेश पाठक यांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन सुधीर बजरंग म्हस्के यांनी केले.

# श्रीराम नवमीनिमित्त गुरुवारी बाजीराव रोडसह लष्कर भागातील रस्ते बंद

**पुणे । प्रतिनिधी**

श्रीराम नवमीनिमित्त बाजीराव रोड, लष्कर भागात मिरवणूका निघतात. त्यामुळे उद्या गुरूवारी (दि.२६) या भागातील वाहतुकीत दुपारी चार ते रात्री दहा वाजेपर्यंत म्हणजेच मिरवणूका संपेपर्यंत वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव यांनी केले आहे.

बाजीराव रस्त्यावरील वाहतूकीत बदल करण्यात येणार आहे. त्यामुळे पुरम चौकातून बाजीराव रोडवरून शिवाजीनगरकडे जाणाऱ्या वाहनांना आवश्यकतेनुसार प्रवेश बंद करण्यात येणार आहे. त्यावेळी वाहनचालकांनी पुरम चौकातून डावीकडे वळून टिळक रस्ताने, अलका टॉकीज चौक, खंडोजीबाबा चौकातून पुढे जावे. तसेच लष्कर परिसरातील देखील वाहतूकीत बदल करण्यात येणार आहे. त्यामुळे वाय जंक्शनवरून एमजी रोडकडे जाणारी वाहतूक ही वाय जंक्शन येथे बंद करण्यात येणार आहे.

मिरवणूका ट्रायलक हॉटेलपासून पुढे १५ ऑगस्ट चौकाच्या पुढे गेल्यानंतर एम.जी रस्त्यावरील वाहतूक १५ ऑगस्ट चौकापासून उजवीकडे व डावीकडे वळविण्यात येणार आहे.

महंमद रफी चौकाच्यापुढे मिरवणूका गेल्यानंतर एम.जी रस्त्यावरील वाहतूक महंमदरफी चौकापासून उजवीकडे ईस्ट स्ट्रीट रोकडकडे वळविण्यात येणार आहे. तसेच या चौकातून मिरवणूका पुढे गेल्या की कोहीनूर हॉटेलपासून एम.जी रोडवर येणारी वाहतूक बंद करून ती भोपळा चौक येथून कुरेशी मस्जिद तसेच सेंटर स्ट्रीट मार्गावर वळविली जाईल. तर होल्गा चौकाकडून महंमद रफी चौकाकडे जाणारी वाहतूक ही मिरवणूकीच्या मार्गानुसार बंद करण्यात येणार आहे. ही वाहतूक सरळ पुढे ईस्ट स्ट्रीट रोडने इंदिरा गांधी चौकाकडे सोडण्यात येणार आहे.

# जिल्हा परिषदेत सभापतिपदासाठी चुरस; २ एप्रिलच्या निवडणुकीकडे लक्ष


**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्हा परिषदेत विविध विषय समित्यांच्या सभापतिपदांसाठी जोरदार चुरस निर्माण झाली असून, २ एप्रिल रोजी होणाऱ्या निवडणुकीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. कृषी, बांधकाम, समाजकल्याण आदी महत्त्वाच्या समित्यांसाठी अनेक इच्छुकांनी जोरदार लॉबिंग सुरू केली आहे. त्यामुळे अंतिम क्षणी कोणाच्या गळ्यात सभापतिपदाची माळ पडते, याबाबत उत्सुकता शिगेला पोहचली आहे.

सभापतिपदाच्या शर्यतीत शांताराम इंगवले, करण खलाटे, सागर मिसाळ, विष्णू हिंगे, विक्रम खुटवड, अंकिता पाटील, तुषार थोरात, श्रीमंत ढोले आणि जितेंद्र बढेकर, सुनील राऊत, छाया तांबे, कल्पना काळे, मोनिका हरगुडे यांची नावे प्रामुख्याने पुढे येत आहेत. या सर्वांनी आपापल्या गटांतर्गत, तसेच वरिष्ठ पातळीवर पाठिंबा मिळवण्यासाठी हालचाली वेगात केल्या आहेत. काही इच्छुकांनी जिल्हा परिषद सदस्यांशी संपर्क साधत मतांची जुळवाजुळव सुरू केली आहे.विशेषतः कृषी व बांधकाम या समित्या जिल्हा परिषदेत अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात. ग्रामीण भागातील विकासकामांवर या समित्यांचा थेट प्रभाव असतो. त्यामुळे या सभापतिपदासाठी इच्छुकांमध्ये मोठी स्पर्धा दिसून येत आहे.

# पुण्यात मित्रानेच मागितली मैत्रिणीकडे २० लाखाची खंडणी, फोटो व्हायरल करण्याची धमकी

**पुणे । प्रतिनिधी**




मैत्रीमध्ये वाद झाल्यानंतर मित्रानेच आपल्या मैत्रिणीला ब्लॅकमेल करत, २० लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केली. एवढेच नाही तर खंडणी दिली नाही तरुणीचे फोटो व्हायरल करून जीवे ठार मारण्याची धमकी दिली.

याप्रकरणी, वारजे माळवाडी पोलिसांनी विजयसिंह संतोष गुंड (वय ३०, रा. मडेवडगाव, ता. श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर) याला अटक केली आहे. याबाबत २४ वर्षीय तरुणीने फिर्याद दिली आहे. हा प्रकार २५ डिसेंबर २०२५ ते गुन्हा दाखल होईपर्यंतच्या कालावधीत घडला आहे. याबाबत बोलताना वारजे माळवाडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक महेश बोळकोटगी यांनी सांगितले की, संशयीत आरोपी विजयसिंह संतोष गुंड आणि फिर्यादी तरुणी एकमेकांच्या ओळखीचे असून त्यांच्यात मैत्री आहे. परंतु, काही कारणातून त्यांच्यात वाद झाले होते. त्यामुळे संशयीत आरोपीने तरुणीचा पाठलाग करून तिच्याकडे २० लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केली. जर तरुणीने त्याला पैसे दिले नाही तर त्याच्यासोबत असलेले तरुणीचे फोटो सोशल मिडीयावर व्हायरल करून तिला जीवे ठार मारण्याची धमकी दिली. फिर्यादी तरुणीला तिच्या इच्छेविरुद्ध हाताला धरून जवळ ओढले. तसेच गावातील ग्रुपवर तरुणीचे फोटो व्हायरल केले. तरुणीच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन संशयीत आरोपी गुंड याने केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, तरुणीने याबाबत पोलिसात तक्रार देताच, गुन्हा दाखल करून वारजे पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

# पुणेकरांवर 'योजनांची खैरात'! महिला आणि ज्येष्ठांना पीएमपी प्रवासात ५०% सवलत

**पुणे । प्रतिनिधी**

महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी पीएमपीच्या तिकिटात ५० टक्के सवलत, महिलांच्या नावावर मिळकत असल्यास ५०० चौरस फुटांच्या आतील मिळकतींना ५० टक्के करमाफी, महिलांसाठी शहरात १०० आधुनिक स्वच्छतागृहे अशा अनेक नव्या योजनांसह स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी महापालिकेचे २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे १५ हजार ६६९ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक मंगळवारी मुख्य सभेत सादर केले.



एका बाजूला महापालिकेचे उत्पन्न ८ हजार कोटींचा टप्पा पार करेल की नाही, असे चित्र असतानाच आधीच आयुक्तांनी जवळपास साडेचारशे कोटींनी फुगविलेल्या अंदाजपत्रात भिमाले यांनी आणखी दीड हजार कोटींची भर टाकली आहे. आयुक्तांनी १३ हजार ९९५ कोटींचे अंदाजपत्रक सादर केले होते. त्यात कुठे कात्री लावत, तर कुठे उत्पन्नाचे आकडे फुगवत भिमाले यांनी १,६७४ कोटी रुपयांची वाढ केली आहे. या अंदाजपत्रकात भांडवली व विकासकामांसाठी ७ हजार ६८७.८५ कोटींची तरतूद करण्यात आली.


महिलांना पीएमपीत ५० टक्के सवलत.त्यात पाणीपुरवठा प्रकल्पासाठी ५७३.७५ कोटी आणि मलनिस्सारण प्रकल्पासाठी २७६.७७ कोटी निधी राखीव ठेवण्यात आला आहे. याशिवाय कर्जफेडीसाठी ८५२.२९ कोटींची तरतूद केली आहे. पर्यावरण, शिक्षण, आरोग्य योजनांसाठी विशेष निधी देण्यात आला असून, महापालिकेच्या शहरी गरीब योजनेसाठी अंदाजपत्रकात तब्बल १५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेस स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजना नाव देण्यात आले आहे. भिमाले यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकात शहरातील महिला, तसेच ६० वर्षांच्या वरील ज्येष्ठ नागरिकांना तिकिटात ५० टक्के सवलत देण्याची घोषणा केली आहे. त्यासाठी पीएमपीला येणारी तूट महापालिका उचलणार आहे. राज्य शासनाच्या एसटी तिकीट सवलतीच्या योजनेच्या धर्तीवर ही योजना राबविली जाणार असून, पुढील महिन्यात त्यासाठीचे धोरण तयार करून त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे. याशिवाय शहरात महिलांसाठी १०० ठिकाणी अद्ययावत स्वच्छतागृहे उभारली जाणार असून, शाळांमध्ये मुलींसाठी पिंक रूम ही संकल्पना राबविण्यात येणार आहे.

# पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ निधीअभावी रखडला; ६ हजार कोटींची प्रतीक्षा

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्याच्या विकासासाठी महत्त्वाकांक्षी मानल्या जाणाऱ्या पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाला अद्याप निधीची प्रतीक्षा आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या स्तरावर प्रकल्पास तत्त्वतः मान्यता मिळूनही प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद अद्याप झालेली नाही. दरम्यान, कोणत्याही क्षणी पैसे येतील, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. पुरंदर तालुक्यातील पारगाव, कुंभारवळण, एकहतपूर आदी गावांच्या परिसरात हा विमानतळ उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पुणे शहरातील वाढती लोकसंख्या, उद्योगधंद्यांचा विस्तार आणि विद्यमान लोहगाव विमानतळावरील ताण लक्षात घेता नवीन विमानतळाची गरज अधोरेखित झाली आहे. मात्र, निधीअभावी प्रकल्पाची गती मंदावली आहे. राज्य शासनाने प्रकल्पासाठी जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू केली असली तरी शेतकऱ्यांना योग्य मोबदला आणि पुनर्वसनाच्या मागण्यांवर अजूनही समाधानकारक तोडगा निघालेला नाही.

याशिवाय पर्यावरणीय परवानग्या, तांत्रिक अहवाल आणि केंद्र शासनाकडून अंतिम मंजुरी या टप्प्यांमध्येही विलंब होत असल्याचे दिसून येते. उद्योग क्षेत्राकडून मात्र या प्रकल्पाकडे मोठ्या अपेक्षेने पाहिले जात आहे. पुणे हे आयटी, ऑटोमोबाईल आणि स्टार्टअप क्षेत्राचे



केंद्र बनत असताना आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ उभारणे अत्यावश्यक मानले जात आहे. विमानतळ सुरू झाल्यास गुंतवणुकीत वाढ होऊन रोजगारनिर्मितीला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. दरम्यान, स्थानिक लोकप्रतिनिधींनीही या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. निधी उपलब्ध करून देत प्रकल्पाला तातडीने गती द्यावी, अशी मागणी सातत्याने केली जात आहे. आगामी अर्थसंकल्पात या प्रकल्पासाठी विशेष तरतूद होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. एकूणच, पुरंदर विमानतळ हा पुण्याच्या भविष्यातील विकासाचा महत्त्वाचा टप्पा मानला जात असला तरी निधीअभावी तो सध्या प्रतीक्षेतच आहे. शासनाने लवकरात लवकर निर्णय घेतल्यास प्रकल्पाला गती मिळून पुण्याच्या विकासाला नवे पंख मिळू शकतील.

कोणत्याही क्षणी येऊ शकतात पैसे

पुरंदर विमानतळासाठी कोणत्याही क्षणी सहा हजार कोटी रुपये प्राप्त होतील, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. ते म्हणाले, बँकेने पैसे देण्यास तयारी दर्शवली आहे. मात्र, प्रशासकीय नियमानुसार सर्व प्रकिया पूर्ण करण्यात येत आहे. ते पूर्ण झाले की कोणत्या क्षणी तत्काळ पैसे जमा होतील. आमची पूर्ण तयारी झालेली आहे. पैसे आले की लगेच आपण शेतकऱ्यांचे पॅकेज जाहीर करणार आहोत.

cmyk